दैनिक
# आरंभ मराठी
www.arambhmarathi.com

सुविचार
नम्रता आणि सद्गुणांनी जीवन अधिक सुंदर होते.



अर्धवट कामामुळे १५दिवसानंतरही बस स्थानक बंदच पेज ४

■ दैनिक ■धाराशिव ■ वर्ष 2 रे ■ अंक 94 ■ गुरूवार दि.15 मे 2025 ■ RNI NO-2023/90078 ■ पाने 04 ■ किंमत रू 5

# राष्ट्रवादीच्या एकत्रीकरणासाठी अजित पवार गट आग्रही

## राज्यात हालचाली वाढल्या,स्थानिक स्तरावर दोन्ही गटाच्या नेत्यांकडून संमिश्र प्रतिक्रिया

आरंभ मराठी / धाराशिव

स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुका चार महिन्यांच्या आत घेण्याचा आदेश सर्वोच्च न्यायालयाने दिला आहे. यामुळे आता जिल्हा परिषद, नगरपरिषद तसेच पंचायत समित्यांच्या निवडणुका होण्याचा मार्ग मोकळा झाला आहे. तीन-साडेतीन वर्षांपासून स्थानिक स्वराज्य संस्थांवरील प्रशासकराज लवकरच संपुष्टात येण्याची आशा आहे. अशातच दोन्ही राष्ट्रवादी एकत्र येण्याच्या चर्चांना उधाण आले आहे. धाराशिव जिल्हा राष्ट्रवादीचा बालेकिल्ला राहिला असून, वरिष्ठ पातळीवर एकत्रीकरणावर काय निर्णय होणार याकडे कार्यकर्त्यांचे लक्ष लागले आहे.या पार्श्वभूमीवर जिल्ह्यातील दोन्ही गटाच्या नेत्यांना काय वाटते, हे जाणून घेण्याचा प्रयत्न केला तेव्हा अजित पवार यांचा गट सकारात्मक असल्याचे दिसून आले.

### राष्ट्रवादी काँग्रेसमध्ये उभी फूट

राष्ट्रवादीत दोन गट पडल्यानंतर धाराशिव जिल्ह्यात देखील त्याची दोन शकले झाली. लोकसभा निवडणुकीत शरद पवार यांची ताकत दिसली तर विधानसभा निवडणुकीत अजित पवार यांनी बाजी मारली. धाराशिव जिल्हा हा राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाच्या स्थापनेपासून पक्षाचा बालेकिल्ला राहिला आहे. माजी मंत्री डॉ. पद्मसिंह पाटील यांनी जिल्ह्यात पक्षाचा गड मजबूत केला होता. त्यांच्यानंतर माजी राज्यमंत्री, आमदार राणाजगजितसिंह पाटील यांनीही पक्ष विस्ताराचे धोरण राबवून पक्ष मोठा केला. २०१४ ते २०१९ या काळात राज्यात आणि केंद्रातही भाजपचे सरकार असतानाही धाराशिव जिल्ह्यात मात्र राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचा गड मजबूत होता. त्यानंतर सप्टेंबर २०१९ मध्ये विधानसभा निवडणुकीपूर्वी राणा पाटील यांनी भाजपात प्रवेश केला आणि राष्ट्रवादी पक्षाला खऱ्या अर्थाने भगदाड पडले. जिल्ह्यातील पक्षाच्या नेतृत्वानेच पक्षांतर केल्यामुळे ऐन निवडणुकीत पक्षासमोर संघटनात्मक बांधणीचे आव्हान उभे राहिले. तशा अवस्थेत सुरेश बिराजदार, राहुल मोटे, संजय निंबाळकर, महेंद्र धुरगुडे, संजय पाटील दुधगावकर, जीवनराव गोरे या नेत्यांनी राष्ट्रवादी पक्ष टिकवून ठेवला. महाविकास आघाडीच्या अडीच वर्षांच्या काळात पक्षाला पुन्हा सुगीचे दिवस आले. परंतु, अडीच वर्षांनी सरकार गेल्यानंतर पुन्हा आव्हान उभे राहिले. त्यातच जुलै २०२३ मध्ये अजित पवार यांनी भाजपसोबत हातमिळवणी करत सरकारमध्ये सामील होण्याचा निर्णय घेतला आणि पक्षाचे दोन तुकडे झाले. त्यानंतर राष्ट्रवादीच्या दोन्ही गटांनी वेगळे होत जिल्ह्यातही वेगळे काम सुरू केले. मागील वर्षी लोकसभा निवडणुकीत अजित




पवार यांच्या राष्ट्रवादीने अर्चनाताई पाटील यांना पक्षाकडून तिकीट दिले. परंतु, त्यामध्ये त्यांचा पराभव झाला. नुकत्याच झालेल्या विधानसभा निवडणुकीत जिल्ह्यात अजित पवार गटाला एकही जागा सुटली नाही. तर शरद पवार गटाच्या राहुल मोटे यांनी माजी मंत्री डॉ.तानाजी सावंत यांना तगडी फाईट दिली. सध्या धाराशिव जिल्ह्यात दोन्ही राष्ट्रवादीची ताकत क्षीण झालेली आहे. अजित पवार गट सत्तेत असल्यामुळे त्यांच्याकडे कार्यकर्त्यांची कमी नाही. परंतु, शरद पवार गटाला संघटनात्मक बांधणी पुन्हा करावी लागणार आहे. अशातच दोन्ही राष्ट्रवादीच्या एकत्रीकरणाच्या चर्चा जोर धरत आहेत. स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुका पुढच्या चार महिन्यात घेण्याचे निर्देश सुप्रीम कोर्टाने दिल्यानंतर या चर्चा मोठ्या प्रमाणात होत आहेत. धाराशिव जिल्ह्यात देखील दोन्ही गटांच्या कार्यकर्त्यांमध्ये एकत्रीकरणाच्या मुद्द्यावरून चर्चा होत आहेत. आगामी जिल्हा परिषद, नगरपालिका, पंचायत समितीच्या निवडणुकीपूर्वी एकत्रीकरणाचा काही निर्णय होतो का याकडे सर्वांचे लक्ष लागले आहे. यामध्ये अजित पवार गटाच्या जिल्ह्यातील कार्यकर्त्यांनी एकत्रीकरणाच्या विषयावर सकारात्मकता दाखवली आहे. तर शरद पवार गटाच्या नेत्यांनी मात्र यावर मोकळेपणाने बोलणे टाळले आहे. तरीही वरिष्ठ पातळीवर यावर काय निर्णय होतो याकडे दोन्ही गटांचे बारीक लक्ष असणार आहे.



### राष्ट्रवादीचे एकत्रीकरण राज्यासाठी फायदेशीर

देशाचे जेष्ठ नेते शरद पवार यांचा प्रदीर्घ अनुभव आणि उपमुख्यमंत्री अजितदादा पवार यांची निर्णयक्षमता ही महाराष्ट्राच्या सर्वांगीण विकासासाठी अत्यंत मोलाची आहे. या दोन्ही नेत्यांचे पुनः एकत्र येणे ही राज्याच्या राजकीय आणि सामाजिक समृद्धीसाठी नक्कीच सकारात्मक दिशा ठरू शकते. पूर्वीपासून एकाच विचारसरणीतून घडलेले कार्यकर्ते पुन्हा एकत्र येत असतील तर ही आनंदाची बाब आहे. जिल्ह्यात देखील पक्षाचे संघटन वाढण्यास त्यामुळे मदत होईल, असे वाटते.



-प्रा. सुरेश बिराजदार,
प्रदेश उपाध्यक्ष
राष्ट्रवादी(अजितपवार)

### हा वरिष्ठ पातळीवरील विषय

राष्ट्रवादी पक्षाच्या एकत्रीकरणाचा विषय हा वरिष्ठ पातळीवरील विषय आहे. यावर मी काही मत मांडावे असे वाटत नाही. सध्या आम्ही विरोधी पक्ष म्हणून काम करत आहोत आणि पुढेही करत राहू. जनसामान्यांचे प्रश्न घेऊन रस्त्यावरचा लढा आम्ही देत आहोत. पक्षाच्या एकत्रीकरणाच्या चर्चा सुरू असल्याचे ऐकिवात आहे परंतु, हा राज्य आणि राष्ट्रीय पातळीवरील विषय असल्यामुळे यावर मी बोलणे संयुक्तिक ठरणार नाही



- संजय पाटील दुधगावकर
जिल्हाध्यक्ष राष्ट्रवादी (शरद पवार)

### एकत्रीकरणाचे स्वागतच करू

दोन्ही राष्ट्रवादीचे एकत्रीकरण झाले तर त्याचे आम्ही स्वागत करू. परंतु, इतक्यात हे एकत्रीकरण होईल असे वाटत नाही. पक्षाची विभागलेली ताकत एकत्र आली तर त्याचा आनंदच होईल. त्यामुळे संख्याबळ वाढेल आणि पक्ष मोठा होईल. दुसऱ्या गटाबरोबर जुळवून घ्यायला अडचण येणार नाही कारण आम्ही अगोदर एकत्र काम केले आहे. एकत्रीकरण झाल्यास दुसऱ्या गटातील वरिष्ठांना नेते मानायला मला काहीच अडचण नाही. आम्ही कार्यकर्ते आहोत, वरिष्ठ जो आदेश देतील तो आम्ही पाळणार.



-महेंद्र धुरगुडे
जिल्हाध्यक्ष राष्ट्रवादी (अजित पवार)

# ६ महिन्यात १२ पुजाऱ्यांना मंदिर बंदी

## तुळजाभवानी मंदिर संस्थानकडून कारवाई

आरंभ मराठी / तुळजापूर

तुळजाभवानी मंदिरात गैरवर्तन करणाऱ्या तसेच नियमांचे पालन न करणाऱ्या १२ पुजाऱ्यांना देऊळ कवायतनुसार मंदिर प्रवेश बंदी करण्यात आली आहे.ही कारवाई अवघ्या ६ महिन्यात करण्यात आली आहे.मंदिर संस्थानच्या वतीने पुजाऱ्यांचे नियमन देऊळ कवायत कायद्यानुसार केले जाते. पुजाऱ्यांवर कारवाई करताना देखील या कायदयातील तरतुदींनुसार कार्यवाही केली जाते. मंदिराचे कायदा व सुव्यवस्थेस अडथळा निर्माण होईल, शिस्तीस बाधा येईल, अशोभनीय वर्तन इत्यादी बाबींवर देऊळ कवायत कायद्यानुसार कारवाई करण्यात येते. मागील ६ महिन्यांत अनेक पुजाऱ्यांना कारणे दाखवा नोटीस देण्यात आली असून एकूण १२ पुजाऱ्यांवर मंदिर प्रवेश बंदीची कारवाई



करण्यात आली आहे.मंदिर प्रवेश बंदीची कारवाई करण्यात आलेल्या पूजाऱ्यांमध्ये ओंकार हेमंत इंगळे (२७/११/२०२४ ते २६/१२/२०२४ एक महिना बंदी), अभिजीत माधवराव कुतवळ (२७/११/२०२४ ते २६/१२/२०२४ एक महिना बंदी) श्रीधर विनायक क्षीरसागर (१७ /१२/२०२४ ते ०१/०१/२०२५ १५ दिवस बंदी), अक्षय किशोर कदम (१७ /१२/२०२४ ते ०१/०१/२०२५ १५ दिवस बंदी), महेश भारत रोचकरी (०४/०१/२०२५ ते १८/०१/२०२५ १५ दिवस बंदी), अजय संजय शिंदे (०४/०१/२०२५ ते १८/०१/२०२५ १५ दिवस बंदी), सुदर्शन यशवंत वाघमारे (०१/०१/२०२५ ते ०१/०७/२०२५ ६ महीने बंदी), रणजीत अविनाश साळूंके (२०/०२/२०२५ ते २०/०४/२०२५ २ महीने बंदी), अमित दत्तात्रय तेलंग-कदम (१२/०४/२०२५ ते १२/०५/२०२५ १ महीना बंदी), नानासाहेब जगन्नाथ चोपदार (१३/०४/२०२५ ते १३/०५/२०२५ १ महीना बंदी), तुषार विजयकुमार पेंदे (२३/०४/२०२५ ते २३/०७/२०२५ ३ महीने बंदी), प्रदीप विलास मोटे (१२/०५/२०२५ ते १२/०८/२०२५ ३ महीने बंदी) यांचा समावेश आहे.

# मंदिर बंदीची नोटीस बजावताच तुळजापुरातील पुजाऱ्याने मद्यधुंद अवस्थेत केली तहसीलदारांना शिवीगाळ,कार्यालयाची काच फोडली

आरंभ मराठी / तुळजापूर

येथील तुळजाभवानी मंदिर संस्थान प्रशासनाकडून देऊळ कवायत कायद्यानुसार कारणे दाखवा नोटिस दिल्याने पुजारी अनुप कदम यांनी मद्यपान करून तुळजाभवानी मंदिर संस्थान कार्यालयात येऊन तहसीलदार तथा व्यवस्थापक श्रीतुळजाभवानी संस्थान यांना अर्वाच्य भाषेत शिव्या देत, गोंधळ घालत तोडफोड केली. याप्रकरणी मंदिर संस्थानकडून पुजाऱ्यावर तुळजापूर पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.मंदिर संस्थानद्वारे नियुक्त सुरक्षा रक्षक पुरवठादार कंपनी कडून संस्थानास प्राप्त अहवालानुसार अनुप कदम यांनी १३ एप्रिल २०२५ रोजी मंदिराच्या व्हीआयपी गेटवर सुरक्षा रक्षकांसोबत धक्काबुक्की व शिवीगाळ करून जीवे मारण्याची धमकी देत जबरदस्तीने मंदिरात प्रवेश केला. यानंतरच्या घटनेत १५ एप्रिल रोजी जिल्हाधिकारी तथा अध्यक्ष श्रीतुळजाभवानी संस्थान यांच्या दालनात



कार्यालयीन कामकाज सुरू असताना अप्पर जिल्हाधिकारी तथा मुख्य कार्यकारी अधिकारी मंदिर संस्थान आणि तहसीलदार तथा व्यवस्थापक श्रीतुळजाभवानी संस्थान यांच्याशी अर्वाच्य भाषेत हुज्जत घातल्यानंतर तहसीलदार तथा व्यवस्थापक श्रीतुळजाभवानी संस्थान यांनी कारवाई करण्याचा इशारा समक्ष देऊनही त्यास न जुमानता वाद घालत तिथेच बसले. दुसऱ्या अहवालानुसार १५ एप्रिल २०२५ रोजी अनुप कदम यांनी श्रीतुळजाभवानी संस्थान कार्यालयातील कंट्रोल रूम च्या दरवाज्यास लाथ घालून दरवाजा उघडल्याची घटना घडली. सुरक्षेच्या दृष्टीने कंट्रोल रूम मध्ये वरिष्ठ अधिकाऱ्यांच्या परवानगी शिवाय प्रवेश देता येत नाही. हे दोन्ही अहवाल प्राप्त झाल्यानंतर मंदिर संस्थान प्रशासनाने फुटेजचे अवलोकन करून वरील घटनांची खात्री केली आणि १२ मे २०२५ रोजी कारणे दाखवा नोटिस देऊन मंदिराच्या कायदा व सुव्यवस्थेस अडथळा निर्माण होईल असे अशोभनीय वर्तन केल्याने देऊळ कवायत कायदा कलम २४ व २५ नुसार ३ महिन्यांची मंदिर प्रवेश बंदी का करण्यात येऊ नये ?, याचा लेखी खुलासा करण्यास सांगण्यात आले.याचा राग मनात धरून अनुप कदम यांनी १३ मे रोजी पुजारी अनुप कदम यांनी मद्यपान केलेल्या अवस्थेत तुळजाभवानी मंदिर संस्थान कार्यालय येथे येऊन तहसीलदार तथा व्यवस्थापक श्रीतुळजाभवानी संस्थान यांच्या नावे अर्वाच्य भाषेत शिव्या देत गोंधळ घातला. यावेळी मंदिर संस्थान कार्यालयाच्या मुख्य प्रवेशद्वाराची काच हाताने फोडली. या घटनेनंतर मंदिर संस्थानकडून तुळजापूर पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

# चौदा वर्षांच्या अल्पवयीन मुलीवर लैंगिक अत्याचार

आरंभ मराठी / उमरगा

आईला आणि भावाला जीवे ठार मारण्याची धमकी देत एका चौदा वर्षीय मुलीवर लैंगिक अत्याचार केल्याची धक्कादायक घटना उमरगा तालुक्यातील एका गावात उघडकीस आली आहे. यासंबधी सविस्तर वृत्त असे की, उमरगा तालुक्यातील एका गावातील १४ वर्षीय मुलगी दिनांक १२ मे रोजी दुपारी साडेतीन ते चार वाजण्याच्या सुमारास घरी असताना गावातील एका तरुणाने तिला फोन करुन तिच्या भावाला व आईला जिवे मारण्याची धमकी देवून बोलावून घेतले. गावातील सौर प्लँटच्या शेडच्या पाठीमागे नेवून त्या नराधमाने तिच्यावर लैंगिक अत्याचार केला. तसेच कोणाला याबद्दल काही सांगितल तर तुझी गावात बदनामी करीन अशी धमकी दिली. पिडीत तरुणीने दिनांक १३ मे रोजी दिलेल्या प्रथम खबरेवरुन भा.न्या.सं.कलम-६४, ६४(), ६५(),७४,७८,३५१(२),३५१(३) सह बा.लै.अ.सं.अधिनियम कलम ४,६,१२ अन्वये त्या तरुणावर उमरगा पोलीस ठाण्यात गुन्हा नोंदवला आहे. पोलीस पुढील तपास करत आहेत.

# प्रशासकीय कार्यालयात शिपायाची आत्महत्या

आरंभ मराठी/धाराशिव



धाराशिव शहरातील मध्यवर्ती प्रशासकीय इमारतीमधील कार्यालयात शिपायाने गळफास घेऊन आत्महत्या केल्याची धक्कादायक घटना उघडकीस आली. मध्यवर्ती प्रशासकीय इमारतीमधील तळमजल्यावरील सहायक संचालक, स्थानिक निधी लेखा परीक्षा या कार्यालयात गळफास घेतला. आत्महत्या करणाऱ्या शिपायाचे नाव नक्कियोद्दीन बशीरोद्दीन काझी (वय ४६) असे आहे. ते धाराशिव शहरातील ख्वाजा नगर परिसरात राहत होते. बुधवारी सकाळी पावणे दहा वाजता ऑफिसचा कंत्राटी शिपाई विनायक क्षीरसागर हा कार्यालय उघडण्यासाठी आला असता, कार्यालय आतून बंद असल्याचे दिसले. यावेळी त्यांना संशय आल्याने त्यांनी आसपासच्या नागरिकांना बोलावून दरवाजा उघडण्याचा प्रयत्न केला. त्यावेळी दरवाजाच्या फटीतून त्यांनी पाहिले असता त्यांना आतमध्ये एका व्यक्तीने गळफास घेतल्याचे लक्षात आले.

# अपर पोलीस अधीक्षकांच्या गाडीचा भीषण अपघात; पती-पत्नी दोघांनाही दुखापत

आरंभ मराठी / धाराशिव

धाराशिवच्या अपर पोलीस अधीक्षक शफकत आमना यांच्या खाजगी गाडीचा मंगळवारी ( दि.१३) रात्री तुळजापूर रोडवरील पळसवाडीजवळ भीषण अपघात झाला. यावेळी त्यांच्यासोबत त्यांचे पती धाराशिवचे तत्कालिन अपर पोलीस अधीक्षक गौहर हसन हेदेखील गाडीत होते. त्यांच्या गाडीला एका कंटेनरने जोरदार धडक दिल्याने गाडी रस्त्याच्या कडेला फेकली गेली. या अपघातात शफकत आमना आणि गौहर हसन यांना गंभीर दुखापत झाली नसली तरी या अपघातातून दोघेही बालंबाल बचावले. यावेळी अपघात झाल्यानंतर कंटेनरचा



ड्रायव्हर पळून गेल्याचे समजते. अपघाताची माहिती मिळताच शहर पोलीस ठाण्याचे पोलीस निरीक्षक शकील शेख यांनी तात्काळ घटनास्थळावर जाऊन दोघांनाही हॉस्पिटलमध्ये दाखल केले. सध्या दोघाही पती-पत्नीवर शासकीय रुग्णालयात उपचार सुरू असून, दोघांचीही प्रकृती ठीक असल्याचे समजते.

# वीज पडून गाईचा मृत्यू परांडा तालुक्याला अवकाळीचा तडाखा

आरंभ मराठी/ परंडा

वीज पडून गाईचा मृत्यू झाल्याची घटना कंडारी येथे मंगळवारी रात्री आठ वाजण्याच्या सुमारास घडली. कंडारीसह परिसरात मंगळवारी दुपारी अवकाळी पाउस झाला.कंडारी, रोहकल, अनाळा, पिस्तमवाडी, कुंभेफळ, पाचपिंपळा या परिसरामध्ये वादळी वारे आणि विजेच्या कडकटासह आवकळी पाउसाने हजेरी लावली.यावेळी शेतकरी कुंडलीक देशमुख यांच्या शेतामध्ये रात्री आठच्या सुमारास विजेचा मोठा कडकडाट झाला. यामध्ये देशमुख यांच्या संकरित गायीच्या अंगावर वीज पडून गाय मृत्युमुखी पडली. दरम्यान पशुसंवर्धन विभागाचे डॉ.ऋषिकेश जगदाळे,तलाठी आकाश वानखेडे यांनी घटनास्थळी जाऊन पाहणी पंचनामा केला असून, शासकीय मदत मिळावी,अशी मागणी देशमुख यांनी केली आहे.

# जिल्ह्यात २० मिमी पाऊस; रविवारपर्यंत अवकाळीचा अंदाज

आरंभ मराठी / धाराशिव

धाराशिव शहर आणि जिल्ह्यात मंगळवारी (दि.१३) दुपारनंतर मुसळधार अवकाळी पाऊस झाला. जिल्ह्यात सर्वत्र या पावसाने हजेरी लावली. दुपारनंतर अचानक ढग दाटून आले आणि विविध भागात पावसाला सुरुवात झाली. गेल्या काही दिवसांपासून राज्यात पूर्वमोसमी पावसाला पोषक वातावरण तयार झालेले आहे. त्यामुळे मागील आठवड्यात ४२ अंशावर असणारे तापमान ३५ अंशापर्यंत खाली आले आहे. धाराशिव जिल्ह्यात मंगळवारी २० मिमी पेक्षा अधिक पाऊस झाला. खरीप हंगामापूर्व मशागतीसाठी हा पाऊस लाभदायक असला तरी या पावसामुळे शेतकऱ्यांचा



कडबा भिजून गेला. तसेच आंबा बागांचे देखील मोठे नुकसान झाले. हा पाऊस रविवार १८ मे पर्यंत कायम राहणार असून, त्यानंतर आठवडाभर वातावरण कोरडे राहण्याची शक्यता आहे. यावर्षी मान्सूनचा पाऊस आठवडाभर आधीच दाखल होण्याचा अंदाज व्यक्त केल्यामुळे कडक उन्हाळ्यापासून यावर्षी लवकर सुटका होईल असा अंदाज आहे.

### १८ मेपर्यंत पाऊस पडेल

अरबी समुद्रात निर्माण झालेली चक्राकार स्थिती तसेच मध्य महाराष्ट्रावर होत असलेला बाष्पयुक्त वाऱ्यांचा पुरवठा यांच्या संयुक्त प्रभावाने महाराष्ट्रात अनेक भागात पाऊस सुरू आहे. सध्या सुरू असलेला पाऊस १८ मे पर्यंत सक्रीय राहिल. त्यानंतर स्थानिक वातावरण निर्माण झाले तरच क्वचित ठिकाणी हलका पाऊस होत राहील. बंगालच्या उपसागरात २५ मे रोजी एक चक्रकार स्थिती निर्माण होऊन कमी दाबाचे क्षेत्र बनेल अशी शक्यता आहे. या हवामान प्रणालीच्या प्रभावाने २५ मे ते २९ मे या कालावधीत महाराष्ट्रात आणखी एकदा जोरदार पावसाची शक्यता बनत आहे. बंगालच्या उपसागरात मान्सूनचे वारे अंदमान निकोबार पर्यंत पोहोचले आहेत. मात्र ते चार ते पाच दिवस अंदमान निकोबार वरच स्थिर होतील असा अंदाज आहे.

-सुरज जयपाल जाधव
हवामान अभ्यासक
(रुईभर)

# छत्रपती संभाजी महाराजांच्या जयंतीचा जिल्हाभर उत्साह

आरंभ मराठी / धाराशिव

स्वराज्याचे दुसरे छत्रपती संभाजी महाराज यांची जयंती बुधवारी (दि.१४) धाराशिव शहर आणि जिल्ह्यात उत्साहात साजरी करण्यात आली. यावेळी शहरातील विविध भागातून चैतन्य आणि मंगलमय वातावरणात भव्य मिरवणुका काढण्यात आल्या. मिरवणुकीत डॉल्बीच्या तालावर तरुणाई थिरकली. सुंदर देखाव्यांनी शहरवासीयांचे लक्ष यावेळी वेधून घेतले. काही मंडळांनी ऑपरेशन सिंदूरच्या धर्तीवर वीर जवानांना अभिवादन केले. विविध भागातून निघालेल्या मिरवणुका रात्रीपर्यंत सुरू होत्या. हाती भगव्या पताका घेऊन छत्रपती संभाजी महाराज की जय, असा जयघोष करत तरुणाई थिरकत होती. छत्रपती संभाजी




महाराज यांच्या जयंतीनिमित्त शहरात विविध ठिकाणी कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले होते. काही ठिकाणी रक्तदान शिबिराचेही आयोजन करण्यात आले होते. सायंकाळच्या सुमारास शहरातील विविध चौकातून भव्य मिरवणुका काढण्यात आल्या. प्रत्येक मिरवणुकीमध्ये फुले व विद्युत रोषणाईने सजवलेल्या रथात छत्रपती संभाजी महाराज यांची मूर्ती ठेवण्यात आली होती. डीजेच्या दणदणाटात युवकांनी नृत्य केले. काही मंडळांनी आकर्षक विद्युत रोषणाई केली होती. यावेळी छत्रपती शिवाजी महाराजांना देखील वंदन करण्यात आले. मिरवणुकीत तरुणाईचा उत्साह शिगेला पोहोचला होता. अनुचित प्रकार टाळण्यासाठी शहरभर पोलीस तैनात करण्यात आले होते.

# लग्न एक समस्या



अगदी आपल्या समकालीन वर्षापूर्वीपर्यंत मुलीचे लग्न जमवणे ही अवघड गोष्ट समजली जात होती. मुलांचे पालक अगदी तोऱ्यात असत.आमच्या मुलाला काय कमी आहे.शेकडो मुली सांगुन येतील असा त्यांना विश्वास होता.पण आता परिस्थिती बरीच बदलेली आहे.म्हणजे अगदी उलट झाली आहे. मुलीचे प्रमाण (संख्या)कमी झाली आहे असा भ्रम निर्माण करून मुलांच्या पालकांमध्ये चिंतेच वातावरण तयार करण्यात आले आहे.त्यामुळेच मुलींच्या अपेक्षा वाढत आहेत.आता मुली प्रत्येक क्षेत्रात आघाडीवर आहेत. मुली उच्च शिक्षण घेऊन स्वतःच पायावर उभ्या आहेत. त्यातुलनेत मुलांचे प्रमाण कमी आहे.त्यामुळेच मुलींच्या अपेक्षा वाढणे स्वाभाविक आहे.पण मार्ग काढावेत.परवा माझ्या परिचयातील बरेच पालक मुलाचे लग्न जमत नाही अशा चिंतेत असल्याचे जाणवले. बरं मुलींची ही लग्न अगदी पटकन जमतात अशातला ही भाग नाही. दोघांची ही वय उलटून जात आहेत. सध्या लग्न जूळवणेही समस्या दोन्ही बाजूने असल्याचे मुख्य कारण मुलींच्या वाढत्या अपेक्षा, त्यात विषेश मुलींच्या पालकांकडून अवाजवी अपेक्षा,! मुलींच्या पालकांनी तर मर्यादा ओलांडत आहेत. पुण्यात नौकरी,पुण्यात घर, एकटाच उच्च शिक्षित मुलगा ,गावाकडे शेती ,मुलीला शेतात जाणे नको . कसं शक्य आहे ?!बरे,काही काही मुलींचे पालक आर्थिक दृष्ट्या कमकुवत असतात .याचा विचार न करता मागण्या करणे योग्य आहे का ? मुलगी जॉब करत असेल तर काही हरकत नाही,परंतू जॉब न करणारी,कमीशिक्षित त्यांनी मोठ्या प्रमाणावर अपेक्षा करणे हे न पटण्या सारखे आहे. यात मुलींची काहीही चुक नाही.याला जबाबदार पालक आहेत असे सद्यस्थितीत वाटते. बरेच मुलीचे पालक ग्रामीण भागात मोलमजुरी करून जगत आहेत. तो पण शेतकरी मुलाला देण्याचे टाळतो. पूर्वी सर्व काही पालकांनीच पाहात असत.पै पाहुणे,खानदान पाहून योग्य ती मुरड घालून लग्न करण्यास तयार करत,पण आता तसे राहिले नाही.मुली आपल्या अपेक्षांच्या बाबतीत मुळीच तडजोड करण्यास तयार नसतात असे सद्यस्थितीत निदर्शनास आले आहे.स्त्री पुरुष समानतेच्या युगात मुला-मुलींच्या पालकांनी अवास्तव अपेक्षा करू नये हे तितकेच खरे आहे.तसेच मुलीने ही जोडीदार निवडताना मुलगा आपल्या पेक्षा वरचढ असायलाच हवा अशी अपेक्षा बाळगणे कितपत योग्य आहे ?! पण हल्ली मुलींना नवरा आपल्या पेक्षा अधिक शिकलेला, अधिक पगार असलेलालग्नापूर्वीच स्वतःचा फ्लॅट असणारा ,शिवाय घरात सर्व सुख सुविधा,साधने तसेच छोटे कुटूंब, इतर कोणीही सदस्य नसावा,अशा अनेक अपेक्षा ठेवून जोडीदार हवा असतो.भावी नवऱ्याचे आईवडील त्याच्या सोबत राहणार ही गोष्ट त्यांना फारशी पसंत नसते.पुण्यातील मुलीस पुण्यातलाच मुलगा हवा असतो.गावाकडे जाणे येणे नको.इतक्या घट्ट चौकटीत बसणारा मुलगा त्यांना मिळणे अवघडच जाते,जेणेकरून मुलीचे व मुलाचे वय मर्यादा उलटून जात आहे,आणी अर्थातच मुली -मुले दोघांचे ही लग्न होणे फारच अवघड होऊन बसले आहे.या अपेक्षा कधी कमी होतील हा एकच गहन प्रश्न पालकांकडून व्यक्त होत आहे.मुलींनी किंवा पालकांनीच समंजस पणे तडजोड करणे आवश्यक आहे.लग्न वयो-मर्यादा उलटून गेल्यानंतर पुढील काळात येणाऱ्या समस्या टाळणे गरजेचे आहे असे वाटते. यातून दोघांनीही तडजोडीने,समजदारपणे, भविष्याचा विचार करून लग्न समस्या दूर होतील यावर विचार करणे आवश्यक आहे.



सोमनाथ बेलुरे
धाराशिव

# यशदा मल्टीस्टेटमध्ये छत्रपती संभाजी महाराज यांची जयंती साजरी

आरंभ मराठी / धाराशिव

हिंदवी स्वराज्याचे दुसरे छत्रपती, महापराक्रमी धर्मवीर छत्रपती संभाजी महाराज यांची जयंती यशदा मल्टीस्टेटच्या मुख्य शाखेत मोठ्या उत्साहात साजरी करण्यात आली. छत्रपती संभाजी महाराजांनी आपल्या धाडस, धैर्य, शौर्य, चातुर्य आणि बुद्धिमत्तेच्या जोरावर हिंदवी स्वराज्याची धुरा यशस्वीरित्या सांभाळली. जयंतीनिमित्त त्यांच्या कार्याला उजाळा देण्यात आला. यशदा मल्टिस्टेटच्या मुख्य शाखेत छत्रपती संभाजी महाराजांच्या प्रतिमेस पुष्पहार अर्पण करून वंदन करण्यात आले.यावेळी क्षितिज बिल्डकॉन ग्रुप परिवाराचे सदस्य तुषार काळे आणि संस्थेचे मुख्य कार्यकारी अधिकारी प्रकाश गरड यांच्यासह यशदा परिवारातील सर्व सदस्य उपस्थित होते.



# कोल्ड्रिंक्सचे पैसे मागितले म्हणून तिघांची एकास मारहाण

आरंभ मराठी / धाराशिव

हॉटेल चालकाने ग्राहकाला कोल्ड्रिंक्स पिल्याचे पैसे मागितले म्हणून तिघांनी हॉटेल चालकाला बेदम मारहाण करून हॉटेलची तोडफोड केल्याची घटना धाराशिव शहरात घडली. यातील आरोपी अक्षय बोराडे (रा.शिंगोली) व त्याच्यासोबतच्या इतर दोघांनी दिनांक १२ मे रोजी रात्री उशिरा धाराशिव शहरातील एमआयडीसी परिसरात फिर्यादी सोपान मारुती कोल्हे (वय ४१ वर्षे, धाराशिव) यांना लस्सी व कोल्ड्रींक्स पिलेले पैसे देण्याच्या कारणावरुन गैरकायद्याची मंडळी जमवून शिवीगाळ केली. तसेच लाथाबुक्यांनी, दगडाने मारहाण करून जखमी केले. आरोपींनी यावेळी हॉटेलमधील सामानाची तोडफोड करुन नुकसान केले. सोपान कोल्हे यांनी दिलेल्या प्रथम खबरेवरुन आनंदनगर पो ठाणे येथेभा.न्या.सं.कलम ११५(२), ३५२, ३२४(२),१८९(२),१९१(२), १९० अन्वये गुन्हा नोंदवला आहे.

## पुर्वीचे दिवस

मामाच्या गावात
पुर्वीची मजा राहिली नाही
पुर्वी कसे आंबे खायची
मजा यायची
मामी अगदी टोफलीभर
आंब्याचा रस करायची
खायला टोपलीभर वेगळेच असायची
शेतात पाड आंबा हूडकण्यात
मजा यायची
सकाळ-संध्याकाळ आंबे खावून
अगदी कंटाळा यायचा
आजी-मामी मिळून लोणचं घालायची
आता मात्र सगळं संपलं
सुट्टीमध्ये मामाच्या गावाला जातो
शेतात जातो पाड शोधावं म्हणतो
पण झाडाचं नाहीत.
मामाने कालचं बाजारातून
बेडेकर लोणचे आणले
मामा बाजारातून आंबे आणतो
केशर,लंगडा,तोतापुरी,बदाम,
मामी मिक्सरयधुन रस करते छान
हापुसचे काप देते भरभरून प्लेटमध्ये
आंबे खावून पोट भरते बरं का
पण कसं सांगू मन नाही भरत
आणि आठवतात ते पूर्वीचे दिवस.

सुभाष रामलिंगप्पा वैरागकर.
९४२३७६५०३१



# मुलांनो,एखाद्या अपयशाने जीवन संपवू नका..

माणसाचे मन,मनगट आणि मेंदूचा विकास करते ते शिक्षण. चांगले काय वाईट काय हे ओळखायला शिकवते ते शिक्षण.माणसाला कणखर बनविते ते शिक्षण.परंतु आज मानसिक ताण तणावातून विद्यार्थी आत्महत्या करतात. अपेक्षित गुण मिळाले नाहीत म्हणून बारावीच्या विद्यार्थ्यांनी आत्महत्या केल्या. नीट परीक्षेचा पेपर अवघड गेला म्हणून आत्महत्या केल्याचे वाचनात आले.अपयशी ठरु म्हणून होणाऱ्या विद्यार्थ्यांच्या आत्महत्या चिंतेचा विषय बनला आहे.उद्या दहावीचा निकाल आहे. विद्यार्थ्यांनी असे वेडेवाकडे पाऊल उचलू नये यासाठी पालकांनी सजग रहाणे गरजेचे आहे. परीक्षेतील गुणांपेक्षा तुमचे जीवन अनमोल आहे.थोडयाशा कारणाने ते गमवू नका. तुम्ही जर वर्षभर नियोजनबद्ध अभ्यास केला असेल तर त्याचे फळ चांगल्या गुणांच्या रुपात तुम्हाला मिळेल. शिक्षणातील वाढती स्पर्धा ताण घेणा-या विद्यार्थ्यांचे सुंदर आयुष्य उध्वस्त करते.पालकांच्या वाढत्या अपेक्षा आणि विद्यार्थ्यांवर लादली जाणारी स्वप्ने याखाली विद्यार्थी दबून जातात.स्पर्धेला तोंड देता देता विद्यार्थ्यांची चांगलीच दमछाक होते.आवडत्या विद्या शाखेत प्रवेश मिळविण्यासाठी प्रचंड स्पर्धेला सामोरे जावे लागते.यातून अपयश आले की मुलांना सहन होत नाही.आपली मानहानी होईल या भीतीने मुले आत्महत्येसारखे पाऊल उचलतात.खरं तर प्रत्येक विद्यार्थ्यांचे एक स्वतंत्र व्यक्तिमत्व असते. प्रत्येकाची बौध्दिक क्षमता वेगवेगळी असते.कौशल्येही वेगवेगळी असतात. आपण मुलांची विनाकारक तुलना करतो आणि त्यांच्या मनात न्यूनगंड निर्माण होईल अशी शाब्दिक शेरेबाजी करतो यामुळे मुले प्रचंड दु:खी होतात.आपल्याला दोषी ठरविले जाते. कोणीच समजून घेत नाही.अशी अपराधीपणाची भावना मनात बळावते.यातून अशा आत्महत्या घडतात.पालक म्हणून आई वडिलांची खूप मोठी जबाबदारी आहे.आधी आपला पाल्य महत्वाचा आहे.मुले हीच आपली खरी संपत्ती आहे.त्यांना गमावून तुम्ही जीवनात काय साध्य करणार आहे.मुलांना समजून घेणे गरजेचे आहे.मुलांना त्यांच्या आवडीने कलाने शिकू द्या. त्यांची बलस्थाने शोधून त्यांना प्रेरीत करा.त्यांच्या पाठीशी खंबीरपणे उभे रहा.त्यांच्यावर तुमच्या इच्छा आकांक्षा अजिबात लादू नका. चुकेल त्यावेळी मुलांना समजून घ्या. त्यांना मानसिक आधार द्या. माझे आईबाप माझ्या मागे खंबीरपणे उभे आहेत या विचाराने मुलांचा आत्मविश्वास वाढतो.परीक्षेच्या पलीकडेही एक सुंदर आयुष्य आहे मुलांना दाखवून द्या. परीक्षेत अपयशी पण आयुष्याच्या रीक्षेत उत्तम कामगिरी केलेली अनेक यशस्वी माणसे आहेत.त्यांचा जीवनप्रवास उलगडून सांगा.शक्य असेल भेटवा. त्यांच्याशी संवाद साधा.परीक्षेतील मार्क म्हणजेच सगळं काही असेही नाही.काही माणसे शाळेची पायरी चढली नाहीत परंतु आपली अंगभूत कौशल्ये आणि व्यवहारज्ञानाच्या जोरावर यशस्वी लोकांच्या यादीत त्यांना मानाचे स्थान आहे. ज्यांच्या हाती परीक्षेत शून्य होता त्यांनी कठोर परिश्रम, जिद्द आणि चिकाटीच्या जोरावर आपले आयुष्य घडविले आहे .अशा माणसांची माहिती द्या.मुलांचे मनोबल वाढवा म्हणजे आयुष्यात येणा-या खाचखळग्यांना सामोरे जाण्याची ताकद त्यांना नक्की मिळेल.आपल्या मुलांना गमवायचे नसेल तर त्याला स्वतंत्रपणे उमलू द्या. फुलू द्या. फक्त एकदा पाठीवर हात ठेवून लढ म्हणा....





लक्ष्मण जगताप
बारामती

# छत्रपती संभाजी महाराज जयंतीनिमित्त मध्यवर्ती शिवशाही प्रतिष्ठानच्या वतीने गरजवंत महिलांना शिलाई मशीनचे वाटप

आरंभ मराठी / धाराशिव

धाराशिव शहरात मध्यवर्ती शिवशाही प्रतिष्ठानच्या वतीने छत्रपती संभाजी महाराज यांच्या जयंतीनिमित्त आयोजित कार्यक्रमात खासदार ओमराजे निंबाळकर यांच्या हस्ते छत्रपती संभाजी महाराजांच्या पूर्णाकृती पुतळ्यास हार घालून अभिवादन करण्यात आले. दर वर्षीप्रमाणे याही वर्षी मध्यवर्ती शिवशाही प्रतिष्ठानने आगळा-वेगळा, मनाला स्पर्शून जाणारा निर्णय घेत डीजे, तासंतास होणारी गोंगाटी मिरवणूक न करता, १० गरजू महिलांना मोफत शिलाई मशीन वाटप करून त्यांच्या जीवनात नवी उमेद निर्माण केली. या शिलाई मिशनचे वाटप खासदार ओमराजे निंबाळकर यांच्या हस्ते करण्यात आले. या उपक्रमातून केवळ एक सामाजिक जबाबदारी नव्हे, तर छत्रपती संभाजी महाराजांच्या विचारांना खरी मानवंदना देण्यात आली.मध्यवर्ती शिवशाही प्रतिष्ठानने मिरवणुकीचा सर्व खर्च टाळून शहरातील यशवंत नगर येथील गरजू महिलांना शिलाई मशिनचे वाटप केले. यावेळी मध्यवर्ती शिवशाही युवा प्रतिष्ठानचे संस्थापक अध्यक्ष लखन देशमुख, मार्गदर्शक अभिजीत देशमुख, रोहित निंबाळकर,धर्मराज सूर्यवंशी, अमित उंबरे,राम मुंडे, विश्वजीत देशमुख,अध्यक्ष हर्षवर्धन देशमुख,उपाध्यक्ष बिन्नी तावसकर,महेश काका सुरवसे सोमनाथ गुरव, रमण जाधव, पंकज पाटील, ओंकार झोरे,आकाश भगत,निखिल देशमुख शेखर घोडके,सागर वेदपाठक,आदेश डक,राज लोमटे, अश्विन लिंगे , नाना महामुनी , राजाभाऊ ढेकणे ,सुशांत भैय्या लोंढे, शुभम सुरवसे, औदुंबर देशमुख, अख्खी अंकुश ,पृथ्वीराज मुळे, आदी उपस्थित होते.





# जंबुद्वीप बुद्ध विहार येथे बुद्ध जयंतीनिमित्त कार्यक्रम

आरंभ मराठी/ धाराशिव

तथागत भगवान गौतम बुद्ध यांच्या २५६९ व्या जयंतीनिमित्त जम्बूद्विप बुद्ध विहार, बौद्ध नगर येथे सामुदायिक बुद्ध वंदना व खीरदान कार्यक्रम घेण्यात आला.हा उपक्रम ३३ वर्षापासुन सुरु आहे. कार्यक्रमाचे उदघाटन शिक्रापूर पोलीस ठाण्याचे निरीक्षक दीपरत्न गायकवाड व अतिरिक्त पोलीस निरीक्षक भीमसेन गायकवाड यांच्या हस्ते महामानवाच्या प्रतिमीचे पूजन करून उदघाटन करण्यात आले.तसेच नागबोधी रिसर्च सेंटर पिंपळदरी यांच्यातर्फे जम्बूद्विप विहाराला भिंतीवरील ६ पंखे भेट स्वरूपात देण्यात आले. आणि सुनील बनसोडे यांच्या तर्फे सतरंजी भेट स्वरूपात देण्यात आली.या प्रसंगी नागबोधीचे अरुण बनसोडे, एम. डी. जानराव, सुनील मनोहर बनसोडे, तर निवृत्त मागासवर्गीय कर्मचारी संघटनेचे दिलीप वाघमारे,यु. व्ही. कांबळे, रवींद्र कांबळे, जम्बूद्रिप बुद्ध विहाराचे संस्थापक अध्यक्ष पृथ्वीराज चिलवंत, सुनील ढगे पाटील, अविनाश भालेराव, हरिश्चंद्र कदम, रंजीत गायकवाड, सतीश शिंदे, सुशांत सोनावणे,प्रमोद चव्हान,कुंदन चिलवंत, बलभीम बनसोडे, रणजित कांबळे, किरण कांबळे, अमरशक्ती चिलवंत, शिलरत्न बनसोडे, सत्यवान भालेराव, शिलरत्न भालशंकर, राहुल वाघमारे, नीतीन लांडगे, आदी मान्यवर उपस्थित होते या कार्यक्रमास महिला आणि पुरुष मोठ्या संख्येने उपस्थित होते.कार्यक्रमाचे प्रास्ताविक जम्बूद्विप विहाराचे संस्थापक अध्यक्ष पृथ्वीराज चिलवंत यांनी केले तर सूत्रसंचालन, नितीन लांडगे यांनी केले. उद्घाटक दीपरत्न गायकवाड आणि भीमसेन यांनी मनोगत व्यक्त केले. कार्यक्रम यशस्वी होण्यासाठी प्रदीप विधाते, मयूर बनसोडे, सम्यक चिलवंत, मुकेश गायकवाड, भाऊसाहेब लांडगे, मिलिंद वाघमारे, सुशांत जाणराव, प्रेम झेंडे, अमोल गायकवाड, शौर्यजित कांबळे, शौर्य गायकवाड, ओम गायकवाड, राज भोसले, हर्षद बनसोडे, अर्हतविर चिलवंत आदी लहान थोर कार्यकर्ते यांनी पुढाकार घेतला.





# क्रेडाई हैं तो भरोसा हैं,शहराच्या विकासासाठी योगदान

## मान्यवरांकडून कौतुक,धाराशिव क्रेडाईचा पदग्रहण सोहळा दिमाखात

### पी. के.मुंडे यांनी स्वीकारला अध्यक्षपदाचा पदभार

आरंभ मराठी / धाराशिव

सामाजिक क्षेत्राबरोबर शहराच्या बांधकाम विकासासाठी क्रेडाई धाराशिवचे अमूल्य योगदान असून, क्रेडाई म्हणजे विश्वास, अशा शब्दात धाराशिवच्या क्रेडाईचा मान्यवरांनी गौरव केला. शहराच्या तांत्रिक विषयाबाबत व शहर डेव्हलपमेंटबाबत क्रेडाई धाराशिव महत्वाचे योगदान देत आहे, असे गौरवोद्गार आमदार कैलास पाटील,क्रेडाई महाराष्ट्राचे माजी अध्यक्ष व क्रेडाई नॅशनलचे एक्झिक्यूटिव्ह कमिटी मेंबर सुनील फुरडे-पाटील यांनी केले.



क्रेडाई धाराशिवच्या नवनिर्वाचित अध्यक्ष, सचिव व पदाधिकाऱ्यांनी २०२५-२७ साठी कार्यभार स्वीकारला.या पदग्रहण सोहळ्याला क्रेडाई महाराष्ट्राचे उपाध्यक्ष शशिकांत जिद्दीमनी, खासदार ओमप्रकाश राजे निंबाळकर,नवनिर्वाचित अध्यक्ष पी.के.मुंडे, सचिव शिवाजी पोळ, खजिनदार प्रदीप खामकर, क्रेडाई महाराष्ट्राच्या प्लॉटिंगवर व बांधकामाची ऑनलाईन प्रणाली बीपीएमएस या पदावर असलेले आशिष पवार, पंकज बाराते आदी मान्यवर उपस्थित होते. केलेल्या कामांचा आढावा सादर करून नवनिर्वाचित पदाधिकाऱ्यांची ओळख पंकज बाराते यांनी करून दिली.तसेच अध्यक्ष प्रदीप मुंडे यांनी पुढील दोन वर्षात करणाऱ्या कामांची रूपरेषा सादर केली. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन दौलत निपाणीकर व ऋतुजा मुंडे यांनी केले. तसेच आभार नवनिर्वाचित सचिव शिवाजी पोळ यांनी केले. पदग्रहण सोहळ्याला पोलाद स्टीलचे सहकार्य लाभले. यावेळी पोलाद स्टीलचे महेश मेंघशेटे रिजनल मॅनेजर, तुषार तिवारी, राजेश लड्डा,समीर करीशेट्टी, वैभव शिंदे तसेच शहरातील विविध मान्यवर या कार्यक्रमासाठी उपस्थित होते. रोटरीचे माजी अध्यक्ष रो.रविंद साळुंके, इंजिनिअर असोसिएशनचे अध्यक्ष श्यामकांत नाईकनवरे, लघुउद्योग भारतीचे अध्यक्ष कोंढारे, पी.आर.काळे, इंद्रजीत आखाडे,चित्राव गोरे, सोमनाथ गुरव, क्रेडाईचे माजी अध्यक्ष रणजित रणदिवे व सर्व पदाधिकारी मोठ्या संख्येने उपस्थित होते.



### बांधकाम विकासासाठी प्रयत्न

धाराशिव जिल्ह्यात बांधकाम व्यावसायिकांच्या प्रश्नासाठी क्रेडाई धाराशिव कटिबद्ध आहे. शहराच्या सर्वांगीण विकासासाठी यापुढील काळातही क्रेडाईचे योगदान असेल,असे मत नवनिर्वाचित अध्यक्ष पी. के. मुंडे यांनी यावेळी व्यक्त केले.

# मुरुडच्या जनता विद्या मंदिर प्रशालेचा निकाल ९७.७३ टक्के



आरंभ मराठी / मुरुड

माध्यमिक शालांत प्रमाणपत्र परीक्षा अर्थात इयत्ता दहावी बोर्ड परीक्षेमध्ये मुरुड येथील जनता विद्या मंदिर प्रशालेचा ९७.७३ % निकाल लागला असून, प्रशालेचे तब्बल ७७ विद्यार्थी ९०% पेक्षा जास्त गुण घेऊन उत्तीर्ण झाले आहेत. इयत्ता दहावी ला परीक्षेसाठी प्रविष्ट झालेल्या एकूण ५२९ विद्यार्थ्यांपैकी ७७ विद्यार्थ्यांना ९०% पेक्षा जास्त गुण प्राप्त झालेले आहेत.

प्रशालेमधून गुणानुक्रमे पहिले तीन विद्यार्थी १)कु.आदिती सचिन आदमीले-१००% २)चि.उदय किशोर सुरवसे-९९.६०% ३)कु. प्रगती धोंडीराम माळी-९८.८०% हे आहेत. तसेच १४९ विद्यार्थी विशेष प्राविण्यामध्ये,१४४ विद्यार्थी प्रथम श्रेणीमध्ये, १०५ विद्यार्थी द्वितीय श्रेणीमध्ये,तर ४२ विद्यार्थी तृतीय श्रेणी मध्ये उत्तीर्ण झालेले आहेत. प्रशालेच्या या यशस्वी विद्यार्थ्यांचे व त्यांना शिकवणाऱ्या सर्व शिक्षकवृंदांचे रुरल एज्युकेशन सोसायटीचे अध्यक्ष यशवंतराव नाडे पाटील, उपाध्यक्ष हरिश्चंद्र माने, सचिव ॲड, विजय पाटील, कोषाध्यक्ष बी.एस. पटाडे, सहसचिव विवेक पांगळ व कार्यकारणी सदस्य सुवर्णाताई पांगळ, दिपक पटाडे, प्रशासकीय अधिकारी अमर मोरे यांच्यासह प्रशालेचे मुख्याध्यापक डी. व्ही. जाधव, ज्येष्ठ पर्यवेक्षक जी. पी. पिसाळ, अरुण पाटील, तनुजा कोष्टी यांनी अभिनंदन केले आहे.

दैनिक

# आरंभ मराठी



# पोहनेर येथील विक्रमसिंह घोलकर यांची सहायक उपप्रादेशिक परिवहन अधिकारी पदाला गवसणी

## गावकऱ्यांकडून भव्य नागरी सत्कार

**आरंभ मराठी / धाराशिव**

धाराशिव तालुक्यातील पोहनेर येथील विक्रमसिंह अण्णासाहेब घोलकर यांनी महाराष्ट्र लोकसेवा आयोगाच्या परीक्षेत यश मिळवून प्रशासकीय अधिकारी पदाला गवसणी घातली. महाराष्ट्र राज्य लोकसेवा आयोगाने २०२३ मध्ये घेतलेल्या राज्यसेवा परीक्षेत विक्रमसिंह घोलकर यांनी यश मिळवले आणि त्यांची सहायक उपप्रादेशिक परिवहन अधिकारी (वर्ग एक) म्हणून निवड झाली. या यशाबद्दल रविवारी (दि.११) पोहनेर गावात त्यांचा भव्य नागरी सत्कार करण्यात आला. या सत्काराच्या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी ज्येष्ठ शिक्षणतज्ञ एम. डी. देशमुख हे होते. तर व्यासपीठावर पोहनेर गावचे निवृत्ती प्रशासकीय अधिकारी दिलीपराव देशमुख, पोहनेर गावचे माजी सरपंच मोहनराव देशमुख, निवृत्त प्राध्यापक बाळासाहेब घोलकर यांची उपस्थिती होती. यावेळी विक्रमसिंह घोलकर यांनी स्पर्धा परीक्षेतील खडतर प्रवास आपल्या भाषणातून सांगितला. नवीन तरुणांनी स्पर्धा परीक्षेत येण्यापूर्वी या क्षेत्रातील धोके ओळखून यावे, तसेच हे क्षेत्र अनिश्चिततेचे असल्यामुळे प्लॅन बी तयार ठेऊन या क्षेत्राकडे येण्याचा सल्ला दिला. कार्यक्रमाचे अध्यक्ष एम. डी. देशमुख यांनी विक्रमसिंह घोलकर याचे कौतुक करत पोहनेरच्या मातीला कायमच यशाचा सुगंध असल्याचे सांगितले. गावातील सर्व नागरिकांनी राजकारण सोडून युवा पिढी घडवण्याचे काम केले तर पुढची पिढी गावाचे नाव मोठे करेल, तरुणांना फक्त नोकरीतच नाही तर उद्योग, व्यवसाय आणि इतर सर्व क्षेत्रात पुढे जाण्यासाठी पाठबळ द्या, तरुणांना स्वावलंबी करा, जबाबदार नागरिक म्हणून आपले सर्वांचे तेच कर्तव्य असल्याचा सल्ला देशमुख यांनी त्यांच्या भाषणात दिला. यशस्वी होत असताना घर, कुटुंब आणि गावच्या मातीला कधीही न विसरण्याचा सल्ला त्यांनी यावेळी दिला. यावेळी पोहनेर गावातील राजकीय, सामाजिक तसेच शैक्षणिक क्षेत्रातील नागरिकांनी कार्यक्रमाला हजेरी लावून विक्रमसिंह घोलकर यांचे कौतुक केले. यावेळी पोहनेर गावचे आजी, माजी प्रशासकीय अधिकारी मोठ्या संख्येने कार्यक्रमाला उपस्थित होते. कार्यक्रमाच्या सुरुवातीला पहेलगाम दहशतवादी हल्ल्यात आणि भारत-पाकिस्तान सीमेवर शहीद झालेल्या जवानांना आणि नागरिकांना श्रद्धांजली अर्पण करण्यात आली. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन काशिनाथ धावारे यांनी केले. तर प्रास्ताविक सज्जन यादव यांनी केले. तर आभार डॉ. अभयसिंह घोलकर यांनी मानले. विक्रमसिंह घोलकर हे साध्य धाराशिव नगर परिषदेत करनिर्धारण व प्रशासकीय अधिकारी म्हणून कार्यरत आहेत.




# संस्कृती सुरवसे हिचे दहावीच्या परीक्षेत यश

**आरंभ मराठी / नळदुर्ग**


नळदुर्ग येथील डॉ. बाबासाहेब आंबेडकर इंटरनॅशनल इंग्लिश मिडियम स्कूल ची विद्यार्थीनी कु. संस्कृती संदिप सुरवसे हिने दहावीच्या परीक्षेत ९३. ६० टक्के गुण मिळवून यश संपादन केल्याबद्दल तिचे सर्वत्र अभिनंदन होत आहे. नळदुर्ग शहर नाभिक समाजाचे अध्यक्ष संदिप उद्धवराव सुरवसे यांची संस्कृती ही मुलगी आहे. तिच्या या यशाबद्दल प्रा. डॉ. दिपक जगदाळे, अजित पंडीत , मारुती खारवे, बाळासाहेब महाबोले, महादेव माने, नेताजी महाबोले, नितीन दळवी, समीर सुरवसे यांनी तिचे अभिनंदन केले आहे.



## दहावी बोर्ड परीक्षेत आरती लकडे इटकळ गावातून प्रथम

**आरंभ मराठी / इटकळ**

दहावी परीक्षेचा निकाल मंगळवार ऑनलाईन जाहीर झाला असून ईटकळ येथील शेतकरी कुटुंबातील मुलीने दहावीच्या परीक्षेत ९३.६० टक्के गुण मिळवत यशाचं शिखर गाठलं आहे. कोणताही क्लास न लावता, जिद्द चिकाटी व अभ्यासाच्या जोरावर आरती अरविंद लकडे ही ईटकळ गावातुन प्रथम आली आहे.



आरती ही अणदूर येथील श्री श्री रविशंकर गुरूकुल शाळेत शिकत होती. तिला सर्व विषयात चांगले गुण मिळाले आहेत. तिच्या या यशाबद्दल आई वडील, नातेवाईक व इटकळ गावातुन तिचे भरभरून कौतुक होत आहे.

## प्रथमेश गायकवाड दहावी बोर्ड परीक्षेत १०० टक्के गुण घेऊन उत्तीर्ण

**आरंभ मराठी / धाराशिव**

धाराशिव शहरातील प्रथमेश गायकवाड या शेतकऱ्याच्या मुलाने दहावी बोर्ड परीक्षेत शंभर टक्के गुण मिळवून उत्तुंग यश मिळवले आहे. त्याच्या या यशाबद्दल श्री श्री रविशंकर शाळेच्या मुख्याध्यापिका सौ.एस.एन, शिक्षक व वडिल विनोद गायकवाड, आई स्वाती गायकवाड, मामा किरण गरड यांनी कौतुक व अभिनंदन केले आहे. प्रथमेश हा सुरुवातीपासूनच हुशार व मेहनती विद्यार्थी असून पाचवी व आठवी शिष्यवृत्ती परीक्षेत त्याने यश संपादन केले होते. त्याच्या पुढील शैक्षणिक वाटचालीस शिक्षक, नातेवाईक व मित्रपरिवार यांनी शुभेच्छा दिल्या आहेत.



# संभाजी महाराज जयंती निमित्त भव्य शिबिर, २४३ जणांचे रक्तदान

**आरंभ मराठी / धाराशिव**

स्वराज्यरक्षक धर्मवीर छत्रपती संभाजी महाराज यांच्या जयंतीनिमित्त मावळा प्रतिष्ठानच्या वतीने भव्य रक्तदान शिबिर आयोजित करण्यात आले होते. सदर रक्तदान शिबिरास उस्फुर्त प्रतिसाद मिळाला. शिबिरात सुमारे २४३ रक्तदात्यांनी रक्तदान केले.शिबिराचे उद्घाटन माजी नगराध्यक्ष मकरंद राजेनिंबाळकर यांच्या हस्ते करण्यात आले. त्यांनी या उपक्रमाबद्दल रक्तदात्यांचे मनस्वी आभार व्यक्त केले व सदर रक्तदात्यांना मावळा प्रतिष्ठान यांच्यावतीने स्पर्धा परीक्षेसाठी लागणारी आवश्यक प्रश्नसंचांची पुस्तके रक्तदात्यांना भेट देण्यात आली. रक्तदान शिबिरास महिलांचा देखील उत्स्फूर्त असा प्रतिसाद होता. धाराशिव शहरात प्रथमच सर्वोत्कृष्ट व स्तुत्य, असा समाजोपयोगी उपक्रम राबवण्यात आला. त्याबद्दल मावळा प्रतिष्ठान व सदस्य मनःपूर्वक हार्दिक अभिनंदन करून या कार्यासाठी माजी नगराध्यक्ष मकरंद राजेनिंबाळकर यांनी मनःपूर्वक शुभेच्छा दिल्या. यावेळी माजी नगराध्यक्ष मकरंद राजेनिंबाळकर, मावळा प्रतिष्ठानचे संस्थापक अक्षय खळदकर, दत्ता मोहिते यांच्यासह सदस्य तसेच शंभू प्रेमी नागरिक उपस्थित होते.



# भाई उद्धवराव पाटील प्रशालेचा दहावीचा निकाल ९७.०१ टक्के


कु. पवार गौरी सतिश 91.40 %


कु. ढगारे सृष्टी रामलिंग 91.60 %

**आरंभ मराठी / धाराशिव**

धाराशिव शहरातील भाई उद्धवराव पाटील प्रशालेचा इयत्ता दहावी बोर्ड परीक्षेचा निकाल ९७.०१ टक्के लागला आहे. प्रशालेतील विशेष प्राविण्यासह १६ विद्यार्थी उत्तीर्ण झाले आहेत. तर प्रथम श्रेणीत २५ विद्यार्थी, द्रितीय श्रेणीत १८ विद्यार्थी तर उत्तीर्ण श्रेणीत ५ विद्यार्थी यशस्वी झाले आहेत. प्रथम क्रमांक ढगारे सृष्टी रामलिंग ( ९१.६० %), द्रितीय क्रमांक पवार गौरी सतीश (९१.४० % ), तृतीय क्रमांक - कु. खांडेकर गीता व्यंकट ( ८८ % ) यांनी यश मिळवले. सर्व यशस्वी विद्यार्थ्यांचे उपळे रयत शिक्षण प्रसारक संस्था, उपळे (मा.) संस्थेचे अध्यक्ष पी.डी. घोगरे, संस्थेचे उपाध्यक्ष महादेव (बापू ) गवाड, संस्थेचे सचिव अरूणराव ( बापू ) घोगरे, संस्था सदस्य अनिल (तात्या ) घोगरे व सर्व संस्था सदस्य, शाळा समिती अध्यक्ष शेटे गणपती राजाराम तसेच प्रशालेचे मुख्याध्यापक उजनकर आर. पी. व सर्व शिक्षक, शिक्षकेत्तर कर्मचारी यांनी अभिनंदन व कौतुक केले आहे.

# हेमंत उंदरे यांना संत गाडगे महाराज सन्मान पुरस्कार

## प्रहारचे प्रमुख बच्चू कडू यांच्या हस्ते गौरव

**आरंभ मराठी / वाशी**

प्रहार संघटनेच्या वतीने समाजातील दिव्यांग, निराधार, वंचित यांच्यासह सामाजिक सेवा करणाऱ्या कार्यकर्त्यांना संताजी- धनाजी पुरस्कार देऊन सन्मानित करण्यात येते. या संघटनेकडून वाशी येथील हेमंत उंदरे यांना सामाजिक कार्याबद्दल संत गाडगे महाराज पुरस्कार देऊन सन्मानित आले. हा सन्मान सोहळा सोलापूर येथे सोमवारी संपन्न झाला.या पुरस्काराबद्दल उंदरे यांचे अभिनंदन होत आहे.यावेळी प्रहार संघटनेचे प्रमुख तथा दिव्यांग कल्याण विभागाचे अध्यक्ष माजी आमदार बच्चू कडु यांची प्रमुख उपस्थिती होती. यावेळी संत गाडगेबाबा सामाजिक सेवा पुरस्काराने हेमंत उंदरे यांचा गौरव करण्यात आला. १९ फेब्रुवारी रोजी पुरस्कारांची घोषणा करून ३१ मार्चपर्यंत इच्छुकांचे कार्यअहवालासह प्रस्ताव मागविण्यात होते. पुरस्कार समितीच्या वतीने ५०० पेक्षा अधिक प्रस्तावाची छाननी करून पुरस्कारार्थींची निवड करण्यात आली. वाशी तालुक्यातील दिव्यांग, निराधार , वंचितांसाठी केलेल्या सामाजिक सेवेची दखल घेत हेमंत उंदरे यांना संत गाडगेबाबा सामाजिक सेवा पुरस्काराने सहकुटुंब गौरविण्यात आले.




### प्रत्येक दिव्यांग बांधवांचा हा सन्मान,

प्रहार संघटनेच्या वतीने माध्यमातून मला मिळालेला संत गाडगेबाबा सामाजिक सेवा पुरस्कार हा केवळ माझा एकट्याचा नसून बच्चु भाऊ यांच्या नेतृत्वावर विश्वास ठेऊन दिव्यांग बांधवांच्या अडीअडचणीत काम करणाऱ्या वाशी तालुक्यातील प्रत्येक दिव्यांग बांधवाचा आहे

-हेमंत उंदरे


# प्रशाला सावरगाव शाळेचा निकाल ९७.१४%

**आरंभ मराठी/तुळजापूर**

तुळजापूर तालुक्यातील जिल्हा परिषद प्रशाला सावरगाव शाळेचा एस एस सी बोर्डाचा वार्षिक निकाल ९७.१४% लागला असून प्रशालेने आपली यशाची परंपरा अबाधित ठेवली आहे.


प्रशालेचे एकूण ७० विद्यार्थी एस एस सी बोर्डाच्या परीक्षेला बसले होते.त्यापैकी ६८ विद्यार्थी उत्तीर्ण झाले. उत्तीर्ण झालेल्या ६८ विद्यार्थ्यांपैकी २९ विद्यार्थ्यांना ७५% पेक्षा जास्त गुण मिळाले आहेत तर ८ विद्यार्थी ९०% पेक्षा जास्त गुण घेऊन उत्तीर्ण झाले आहेत.प्रगती तायप्पा ताटे ही ९७.८०% गुण मिळवत प्रशालेतून प्रथम, ९७.६०% गुण घेऊन स्नेहा महादेव कुंभार व्दितीय तर ९५.८०% गुण घेऊन सार्थक सोमनाथ मेंगले तृतीय आला आहे.९५.४०% गुण मिळवत दिव्या दीपक सुतार ही चौथ्या क्रमांकाने उत्तीर्ण झाली आहे.स्नेहा कुंभार विज्ञान विषयात १०० पैकी १०० गुण तर प्रगती ताटे व दिव्या सुतार यांनी ९९ गुण प्राप्त केले आहेत.सार्थक मेंगले याने गणित विषयात १०० पैकी ९९ गुण पटकावले आहेत.ग्रामीण भागात राहून प्रशालेच्या विद्यार्थ्यांनी मिळवलेले हे यश सर्वांच्या कौतुकाचा विषय ठरला आहे. प्रशलेच्या या यशाबद्दल शाळा व्यवस्थापन समितीचे अध्यक्ष, उपाध्यक्ष, सर्व सदस्य ,सरपंच, उपसरपंच, ग्रामपंचायतचे सर्व सदस्य, गावातील सर्व प्रतिष्ठित नागरिक, पालक, मुख्याध्यापक व सर्व शिक्षक वृंद यांनी विद्यार्थ्यांचे अभिनंदन केले.



# उन्हाचा तडाखा;माणसांसोबत मुक्या जनावरांनाही त्रास

## दूध उत्पादन, प्रजनन क्षमता कमी; चाऱ्याच्या व्यवस्थापनाची गरज





**हर्षवर्धन मडके / मोहा**

सध्या प्रचंड उष्णतेने कहर माजवला असून, कळंब तालुक्यात तापमान ४० अंशांच्या पुढे गेले आहे. या भीषण उन्हाच्या झळा फक्त माणसांनाच नव्हे, तर मुक्या प्राण्यांनाही त्रासदायक ठरत आहेत. विशेषतः दुधाळ गायी-म्हशींसह इतर पाळीव जनावरे आजारांना बळी पडत आहेत. उष्णतेचा प्रभाव वाढत चालला आहे.या स्थितीत जनावरांचे आरोग्य आणि उत्पादनक्षमतेवर परिणाम होऊ नये, यासाठी शेतकऱ्यांनी खबरदारी घेणे अत्यंत आवश्यक झाले आहे.

### थंड पाण्याचा मुबलक पुरवठा आवश्यक

अतिउष्णतेमुळे जनावरांची तहान अधिक वाढते. त्यामुळे त्यांना दिवसभर स्वच्छ आणि थंड पाणी उपलब्ध करून देणे अत्यंत महत्त्वाचे आहे. शक्य असल्यास रांजणातील थंड पाणी पाजावे. जनावरांना उष्माघात होऊ नये म्हणून त्यांना सावलीत ठेवावे आणि दर काही वेळाने त्यांच्या अंगावर थंड पाणी शिंपडावे.

### शेतकऱ्यांनी काय काळजी घ्यावी?

चाऱ्याची बारीक कुट्टी करून तो वेळेवर आणि विभागून द्यावा

कोरड्या चाऱ्यावर मिठाचे किंवा गूळ पाणी शिंपडावे

हिरव्या आणि वाळलेल्या चाऱ्याचे योग्य प्रमाणात मिश्रण करावे

जनावरांना सकाळी आणि संध्याकाळी थंड व स्वच्छ पाणी द्यावे

जनावरांना शक्यतो सावलीत ठेवावे आणि गरज असल्यास थंड पाण्याने अंघोळ घालावी

### उन्हाळ्यातील योग्य व्यवस्थापन महत्त्वाचे

उन्हाळ्यात जनावरांच्या चारा आणि पाण्याच्या व्यवस्थेकडे विशेष लक्ष देणे आवश्यक आहे. दिवसभर लागणारा चारा एकाच वेळी न देता, तो तीन ते चार वेळात विभागून द्यावा. चारा बारीक करून दिल्यास नासाडी टाळता येते, अन्यथा सुमारे ३९ टक्के चारा वाया जातो. हिरवा चारा उपलब्ध असल्यास, तो वाळलेल्या गवताबरोबर मिसळून द्यावा. तसेच, कोरड्या चाऱ्यावर गूळ किंवा मिठाचे पाणी शिंपडल्यास जनावरे तो अधिक आवडीने खातात.

### पशुतज्ज्ञांचा सल्ला

उन्हाळ्यात दुधाळ जनावरांचे आरोग्य, दूध उत्पादन आणि प्रजननक्षमतेवर मोठा परिणाम होतो. त्यामुळे त्यांची काळजी घेणे गरजेचे आहे. पुरेसे पाणी, पोषक चारा आणि थंड वातावरण उपलब्ध करून दिल्यास या त्रासावर नियंत्रण मिळवता येऊ शकते,'' असे डॉ. दिनेश सुडके यांनी सांगितले.

### उष्णतेचा जनावरांवर विपरीत परिणाम

अतिउष्ण हवामान, पाण्याची टंचाई आणि हिरव्या चाऱ्याचा अभाव यामुळे जनावरांमध्ये उष्माघात, अपचन, रक्तस्त्राव, मिल्क फिव्हर अशा प्रकारचे आजार मोठ्या प्रमाणावर दिसून येत आहेत. परिणामी, दूध उत्पादनात घट होत असून, प्रजननक्षमतेवरही नकारात्मक परिणाम होत आहे. यामुळे शेतकऱ्यांनी आपल्या जनावरांची विशेष काळजी घेण्याचे आवाहन पशुतज्ज्ञ करत आहेत.

# धाराशिव प्रशालेचा इयत्ता दहावीचा निकाल ८६.२० टक्के

**आरंभ मराठी / धाराशिव**

महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळाच्या वतीने घेण्यात आलेल्या दहावीच्या परीक्षेचा ऑनलाइन निकाल १३ मे रोजी जाहीर करण्यात आला.उस्मानाबाद जिल्हा स्वातंत्र्यसैनिक समिती संचलित धाराशिव प्रशालेचा निकाल ८६.२० % लागला आहे. यावर्षी एकूण २९ विद्यार्थी परीक्षेस बसले होते. त्यापैकी २५ विद्यार्थी उत्तीर्ण झाले. यामध्ये विशेष प्राविण्य १, प्रथम श्रेणी ८, द्वितीय श्रेणी १३, उत्तीर्ण ३ झाले आहेत. प्रशालेत प्रथम दिव्या जीवन वाळा, द्वितीय संध्या महादेव काकडे, तृतीय निजबा अहमद शेख यांनी क्रमांक पटकावले. विद्यार्थ्यांच्या यशाबद्दल संस्थेचे अध्यक्ष प्रकाश मालखरे,सचिव दत्तात्रय गणेश,उपाध्यक्ष अण्णासाहेब जाधव,कोषाध्यक्ष उमाजीराव देशमुख, सहसचिव समीर मालखरे,ॲड.सुग्रीव नेरे, संचालिका चित्राताई मालखरे, बाळासाहेब सुर्यवशी, सुरेश धारूरकर, प्रदिप गणेश यांनी शिक्षकांचे व विद्यार्थ्यांचे अभिनंदन केले.

# आर्या विसाळचे दहावी परीक्षेत घवघवीत यश

**आरंभ मराठी/ धाराशिव**

येथील यशवंत नगर येथील रहिवाशी व तेरणा पब्लिक स्कूलची विद्यार्थिनी आर्या आशिष विसाळ हिने घवघवीत यश संपादन केले असून,तिच्या यशाबद्दल सर्वत्र अभिनंदन होत आहे.सीबीएसई बोर्डाच्या दहावीच्या परीक्षेत तिने ८५ टक्के गुण मिळवले आहेत.तिचे डॉक्टर होण्याचे स्वप्न असून, तिच्या यशाबद्दल शाळेचे मुख्याध्यापक, शिक्षक,आप्तेष्ट, नातेवाईकांनी अभिनंदन केले आहे.तसेच तिच्या यशाबद्दल नाशिकचे विभागीय आयुक्त डॉ.प्रवीण गेडाम यांनीही अभिनंदन केले आहे.



# पीक विमा योजनेचे महत्वाचे दस्तऐवज अजूनही पीक विमा कंपनीकडेच

## कृषी आयुक्तालयाने कागदपत्रे संभाळण्याचीही घेतली नाही तसदी

**आरंभ मराठी/ धाराशिव**

प्रधानमंत्री पिक विमा योजना राबवण्याबाबत शासन गंभीर आहे की नाही अशी शंका आता शेतकऱ्याच्या मनात येत आहे. ही योजना शासन राबविते की पिक विमा कंपन्या असा प्रश्न देखील सर्वसामान्य शेतकऱ्याला पडला आहे. त्याला कारणही तसंच आहे. योजनेसंदर्भात काही महत्त्वाची माहिती हवी असल्यास कृषी आयुक्तालयाने ती माहिती देणे अभिप्रेत आहे. परंतु ती माहिती पिक विमा कंपनीकडून घेण्याचा अजब सल्ला कृषी आयुक्तालय देते. त्यामुळे मागील काळात पीक विमा कंपनीची मनमानी वाढली होती.

पिक विमा अभ्यासक आणि सामाजिक कार्यकर्ते अनिल जगताप यांनी महाराष्ट्र शासनाच्या कृषी आयुक्त कार्यालयाकडे पीकविमा प्रकरणातील काही माहिती मागवली होती. ३० एप्रिल २०२४ च्या केंद्रशासनाच्या परिपत्रकाने निर्माण झालेल्या अडचणी संदर्भात माहिती त्यांनी मागितली होती. होती त्यात त्यांनी हे परिपत्रक लागू झाल्यानंतर महाराष्ट्रातील किती महसूल मंडळामध्ये २५ टक्के पेक्षा जास्तीच्या पूर्वसूचना आल्या व इतर मंडळांना किती नुकसान भरपाई दिली गेली याची माहिती मागवली होती. मात्र त्यांच्या पत्राला उत्तर देताना कृषी आयुक्त कार्यालयाने ही माहिती कृषी आयुक्त कार्यालयाकडे उपलब्ध नसल्याचे सांगून ती माहिती पीक विमा कंपनीकडेच असून ती त्यांच्याकडून घ्यावी असा अजब सल्ला दिला. सोबतच त्यांनी पिक विमा कंपन्यांची यादी देखील दिली. लोकसभेच्या आचारसंहितेच्या कालखंडात काढलेल्या या परिपत्रकाने शेतकऱ्यांचे कंबरडे मोडले. शेती पिकाचे नुकसान झाल्यानंतर जर एखाद्या महसूल मंडळातील २५ टक्के पेक्षा जास्तीच्या शेतकऱ्यांनी नुकसानीच्या पूर्वसूचना पिक विमा कंपनीला दिल्या तर त्यांना केंद्राचे हे परिपत्रक लागू होते. त्यात एकूण नुकसान भरपाईच्या केवळ २५ टक्के रक्कम देण्याची जुलमी तरतूद आहे. या संदर्भात महाराष्ट्राची माहिती विचारली होती. मात्र ती राज्य शासनाच्या कृषी विभागाकडे उपलब्ध नसून ती पिक विमा कंपनीकडून घ्यावी असा अजब सल्ला दिला गेला. पिक विमा कंपन्या स्वतःला अडचणीत आणणारी ही माहिती व्यवस्थित का ठेवतील? असा प्रश्न कृषी आयुक्तालयाला पडला नाही. कृषी विभागाच्या भोंगळ कारभाराचा फटका राज्यातील कोट्यवधी शेतकऱ्यांना बसत असून याकडे कोणाचेही लक्ष नसल्याचे दिसते.

### परिपत्रकामुळे पीक विमा कंपन्या मालामाल



प्रधानमंत्री पिक विमा योजने संदर्भात काही माहिती कृषी आयुक्त कार्यालयाकडे मागवली होती. मात्र ती माहिती त्यांच्याकडे उपलब्ध नसून ती पिक विमा कंपनीकडून घेण्याचा अजब सल्ला दिला गेला. याचा अर्थ ही योजना राबविण्याबाबत राज्य शासन अजिबात गंभीर नव्हते. त्यामुळेच आठ वर्षाच्या कालखंडात पिक विमा कंपनीचा ११ हजार कोटी रुपयांचा फायदा झालेला आहे. त्यामुळे शेतकऱ्यांना आर्थिक दिलासा मिळण्याऐवजी पिक विमा कंपन्या मालामाल झाल्या आहेत.

- अनिल जगताप, पिक विमा याचिकाकर्ते

### परिपत्रकामुळे जिल्ह्याचे कोट्यवधी रुपयांचे नुकसान

खरीप २०२३ मध्ये धाराशिव जिल्ह्यातील एकूण ५७ महसूल मंडळापैकी ३२ महसूल मंडळात २५ टक्के जास्तीच्या पूर्व सूचना आल्या होत्या. त्यामुळे हे सूत्र लागू होऊन २५%च नुकसान भरपाई दिली. ती रक्कम २६० कोटी इतकी आहे. म्हणजे आणखी ७५ टक्के रक्कम यायला हवी होती ती ७८० कोटी रुपये इतकी होती. तेवढे नुकसान खरीप २०२३ मध्ये धाराशिव जिल्ह्यातील शेतकऱ्यांचे झाले. खरीप २०२४ मध्ये ५७ पैकी ५७ महसूल मंडळात २५% जास्तीच्या पूर्व सूचना आल्या होत्या. एकूण नुकसान भरपाईची रक्कम केवळ अडीचशे कोटी इतकी आहे. याचा अर्थ आणखी ७५० कोटी रुपये यायला हवे होते. मात्र ते या परिपत्रकाने आले नाहीत. याचा अर्थ दोन वर्षांमध्ये एकट्या धाराशिव जिल्ह्याचे १५८० कोटी रुपयांचे नुकसान झाले आहे. हा एवढा महत्त्वपूर्ण व गंभीर विषय असताना याची माहिती राज्य शासनाच्या कृषी आयुक्त कार्यालयाकडे उपलब्ध झाली नाही ही अतिशय गंभीर बाब आहे.

# हंगरगा येथे ज्ञानेश्वरी पारायण, अखंड हरिनाम सप्ताहाचा शुभारंभ



**आरंभ मराठी / जळकोट**

तुळजापूर तालुक्यातील हंगरगा (नळ) या गावात ज्ञानेश्वरी पारायण व अखंड हरिनाम सप्ताह सोहळ्याला ८ मे रोजी मोठ्या भक्तीभावात आणि उत्साहात सुरुवात झाली. या पवित्र कार्यात गावातील महिला, पुरुष, तरुण आणि लहान मुले यांनी मोठ्या संख्येने सहभाग घेतला. सकाळी काकड आरतीने कार्यक्रमाला सुरुवात झाली. त्यानंतर पारंपरिक पद्धतीने पालखी सोहळा काढण्यात आला. नंतर ज्ञानेश्वरी पारायण सुरू झाले. या सर्व धार्मिक कार्यक्रमांमुळे संपूर्ण गावाचे वातावरण भक्तीमय झाले होते. आठवडाभर चालणाऱ्या सप्ताहामध्ये रोज हरिपाठ, भजन, कीर्तन, प्रवचन असे विविध धार्मिक कार्यक्रम होणार आहेत. गावातील सर्वजण या कार्यक्रमांमध्ये मनापासून सहभागी होत आहेत. हा सोहळा गावात एकतेचा आणि भक्तीचा संदेश देत आहे. गावातील सर्व नागरिकांनी या सप्ताहात सहभागी व्हावे, असे आवाहन आयोजकांनी केले आहे.

दैनिक आरंभ मराठी

www.arambhmarathi.com

आपलं धाराशिव....

गुरूवार दि.15 मे 2025



# तुळजापूर शहरातील बस स्थानकाचा उद्घाटनानंतरही वापर करता येईना

## अर्धवट कामाच्या उद्घाटनामुळे पंधरा दिवसानंतरही बस स्थानक बंद अवस्थेतच

### बस स्थानकावर तळीरामांची बैठक

**सूरज बागल/आरंभ मराठी**

**तुळजापूर येथे येणाऱ्या भाविकांच्या सोयीसाठी तब्बल आठ कोटी रुपयांचा निधी खर्चून उभारण्यात आलेल्या बस स्थानकाचे अर्धवट काम झाले असून देखील ३० एप्रिल रोजी त्याचे पालकमंत्री प्रताप सरनाईक यांच्या हस्ते घाईगडबडीत उद्घाटन करण्यात आले. उद्घाटन करूनही पंधरा दिवस झाले तरी हे बस स्थानक अजूनही सुरू झाले नसल्याने उद्घाटनासाठी नेमकी कशासाठी घाई केली असा प्रश्न उपस्थित केला जात आहे. कोट्यवधी रुपये खर्चून बनवण्यात आलेले बस स्थानक प्रत्यक्ष वापरात कधी येईल याचे उत्तर कोणाकडेच नाही.**



तीर्थक्षेत्र तुळजापूर येथे दररोज हजारोच्या संख्येने भाविक येत असतात. यात्रा कालावधीत ही संख्या लाखोंच्या घरात जाते. तुळजापूरला येण्यासाठी सार्वजनिक वाहतूक व्यवस्था म्हंटले की एस टी बस हा एकच पर्याय आहे. त्यामुळे येथे दोन बस स्थानके उभारण्यात आली आहेत. काही वर्षांपूर्वी लातूर रोड येथे नवीन बस स्थानक उभारण्यात आल्यानंतर दोन वर्षांपूर्वी शहरातील जुने बस स्थानक पाडून नवीन उभारण्यासाठी बांधकाम सुरू करण्यात आले होते. बांधकाम सुरू झाल्यापासून सुरुवातीपासूनच या बस स्थानकाच्या कामाच्या दर्जाबाबत अनेक प्रश्न उपस्थित केले गेले होते. यासाठी अनेक सामाजिक कार्यकर्ते व राजकीय कार्यकर्ते यांनी निवेदन तसेच आंदोलन केली होती. दरम्यान विधानसभा निवडणुकी आगोदर उद्घाटनाचा घाट घालण्यात आला होता. मात्र कामे अपूर्ण असल्याने हे उद्घाटन रखडले होते. त्यानंतर ३० एप्रिल रोजी पालकमंत्री तथा परिवहन मंत्री प्रताप सरनाईक यांच्या हस्ते या बस स्थानकाचे उद्घाटन करण्यात आले. उद्घाटनाच्या दोन-तीन दिवस अगोदर कामांना वेग देत कामे उरकण्यात आली होती. संरक्षण भिंती तसेच इतर काही कामे करण्यात आली. मात्र शौचालय, पिण्याचे पाणी, तसेच इतर सुविधा अपुर्ण असल्यामुळे उद्घाटनानंतरही हे बस स्थानक अजूनही बंद अवस्थेत आहे. त्यामुळे नेमकी उद्घाटनाची घाई कशासाठी केली असा प्रश्न आता प्रवाशातून विचारला जात आहे.

### तळीरामांचा बनला अड्डा

हे बस स्थानक बंद असल्याने याचा फायदा काही तळीराम घेत असून रात्रीच्या वेळी येथे तळीरामांसाठी चांगली प्रशस्त जागा मिळत असल्याने येथे तळीरामांची गर्दी पाहायला मिळत आहे. हे बस स्थानक म्हणजे ओपन बार झाला असून, याठिकाणी रात्री आणि दिवसाही बैठक बसलेली असते. आडोशाचा आसरा घेऊन याठिकाणी तळीरामांनी कायम तळ ठोकलेला असतो.

### बांधकाम परवानाच घेतला नसल्याचा आरोप

बस स्थानकाचे काम सुरू होऊन देखील कितीतरी दिवस या कामाचा बांधकाम परवाना नगर परिषदे कडून घेण्यात आला नव्हता. याबद्दल तक्रार दाखल झाल्यानंतर हा परवाना घेण्यात आला होता. त्यामुळे या बांधकामाच्या दर्जावर किती विश्वास ठेवायचा हा मोठा प्रश्न आहे. यासंबंधी मागील वर्षी आंदोलने देखील करण्यात आली होती. परंतु त्याची दखल घेण्यात आली नव्हती.

# राजर्षी छत्रपती शाहू महाराज समाजरत्न राज्यस्तरीय पुरस्काराबद्दल धनंजय शिंगाडे यांचा सत्कार



**आरंभ मराठी / धाराशिव**

धाराशिव जिल्ह्यातील सामाजिक, शैक्षणिक आणि औद्योगिक क्षेत्रातील उल्लेखनीय कार्याबद्दल बहुजन योद्धा सामाजिक संघटनेचे संस्थापक अध्यक्ष धनंजय गंगाधर शिंगाडे यांना अखिल भारतीय मराठी साहित्य परिषदेच्या वतीने राजर्षी छत्रपती शाहू महाराज समाजरत्न राज्यस्तरीय पुरस्काराने नुकतेच सन्मानित करण्यात आले. यानिमित्त तमाम धाराशिवकरांच्या वतीने त्यांचा सत्कार करण्यात आला. यावेळी ॲड.खंडेराव चौरे नगरसेवक खलील सय्यद, मुकुंद घुले, संजय मुंडे, पांडू आण्णा भोसले, रविंद्र सुर्यवंशी, अर्जुन पवार, सुभाष पवार, नंदकुमार शेटे, विशाल शिंगाडे, प्रसेंजित शिंगाडे, अनिरुद्ध कावळे, सुगत सोनवणे, यशवंत शिंगाडे, सारिपूत शिंगाडे यांच्यासह बहुजन योद्धा सामाजिक संघटनेचे पदाधिकारी उपस्थित होते.

# पोहनेर येथील किसान विद्यालय शाळेचा दहावीचा निकाल १०० टक्के

**आरंभ मराठी / धाराशिव**




धाराशिव तालुक्यातील पोहनेर या गावातील किसान विद्यालय या शाळेने यशस्वी निकालाची परंपरा यंदाही कायम राखली आहे. माध्यमिक शालांत प्रमाणपत्र परीक्षा अर्थात इयत्ता दहावी बोर्ड परीक्षेचा शाळेचा निकाल १०० टक्के लागला आहे. शाळेत प्रथम क्रमांक लोभे समाधान भागवत याने पटकावला असून त्याला ९०.८० टक्के गुण मिळाले आहेत.द्वितीय कु.गरड तेजल भीमराव ८८.६० टक्के आणि तृतीय फावडे ओम राजेंद्र ८८.२० टक्के व यादव देवयानी दत्तात्रय -८८.२० टक्के या दोघांनी पटकावला आहे. निकालात विशेष प्रावीण्यसह १० विद्यार्थी यशस्वी झाले आहेत. प्रथम श्रेणीत १३, द्वितीय श्रेणीत ८ आणि उत्तीर्ण श्रेणीत १ विद्यार्थी पास झाला आहे. परीक्षेस एकूण ३२ विद्यार्थी बसले. होते व सर्व ३२ विद्यार्थी उत्तीर्ण झाले आहेत. सर्व यशस्वी विद्यार्थ्याचे श्री.शिवाजी शिक्षण प्रसारक मंडळ पोहनेरच्या अध्यक्षा श्रीमती अर्चनाताई देशमुख, उपाध्यक्ष आनंद जगदाळे, सचिव अशोक घोलकर व सर्व संस्था पदाधिकारी, शाळेचे मुख्याध्यापक डी.एस. पोवळे तसेच शिक्षक, शिक्षकेतर कर्मचारी, गावातील नागरिकांनी यशस्वी विद्यार्थ्यांचे अभिनंदन करून पुढील वाटचालीस शुभेच्छा दिल्या आहेत.

# शिक्षणापासून दुरावलेला आदित्य दहावी परीक्षा उत्तीर्ण

**आरंभ मराठी / धाराशिव**

धाराशिव- जिल्हा परिषद वडगाव येथील दहावी मध्ये शिकत असलेला विद्यार्थी आदित्य पांढरे हा शिक्षणापासून दुरावला होता. शिक्षणाविषयीचा असलेला न्यूनगंड त्यामुळे तो शाळेत हजर राहत नसे. परंतु मुख्यमंत्री युवा प्रशिक्षण कार्य योजना अंतर्गत शिक्षक रवींद्र पोवळे यांनी या विद्यार्थ्याला शिक्षण प्रवाहात आणून त्यामध्ये असणारा न्यूनगंड दूर केला. विविध मार्गातून त्याला मदतीचा हात देऊन दहावी उत्तीर्ण होण्यासाठी प्रोत्साहित केले.एका मजुराचा मुलगा दहावी परीक्षा उत्तीर्ण झाल्यामुळे जिल्हा परिषद शाळेच्या मुख्याध्यापक ज्योती राऊत, रोहित चौधरी ,सर्व शिक्षक शिक्षिका यांनी आदित्य पांढरे याचे अभिनंदन केले. या सर्वांचे त्याला मार्गदर्शन मिळाले.यशाबद्दल आदित्य पांढरे याचे सर्वत्र अभिनंदन केले जात आहे.

# संत ज्ञानेश्वर महाराज निवासी मूकबधिर विद्यालयाचा दहावीचा निकाल १०० टक्के

**आरंभ मराठी / कळंब**



धाराशिव जिल्ह्यात मुकबधिर प्रवर्गातून प्रथम क्रमांक मिळवत,तुळजाई प्रतिष्ठान बहुउद्देशीय संस्था पानगांव संचलित संत ज्ञानेश्वर महाराज निवासी मूकबधिर विद्यालय कळंब जि.धाराशिव येथील इयत्ता दहावी बोर्ड परीक्षेचा १०० टक्के निकाल लागला आहे. विशेष प्राविण्य ०२, प्रथम श्रेणीत ०६, द्वितीय श्रेणीमध्ये ०१ विद्यार्थी उत्तीर्ण झाले आहेत. यामध्ये लखन व्यंकट अवधूते - ७५.६०% प्रथम, कु.स्नेहा समाधान कोळी - ७५.२०% द्वितीय, गणेश सुधाकर वनवे - ७१.६०% तृतीय, विष्णू श्रीहरी वायबसे - ६९. ८०% , जयराम व्यंकट अवधूते- ६०.८० %, सुरज प्रताप वाघमारे -६९.६०%, कु. तेजस्विनी प्रदीप चवरे- ६८.०० %, सुमित शिवाजी इंगळे- ६४. ६० %, कृष्णा महादेव शिंदे - ५७. ६०%, हे सर्व विद्यार्थी यशस्वी झाले आहेत. या सर्व उत्तीर्ण विद्यार्थ्यांचे तुळजाई प्रतिष्ठानचे सचिव शहाजी चव्हाण व शाळेचे मुख्याध्यापक बालाजी जाधवर, विशेष शिक्षक आश्रुबा कोठावळे, गुंड सुनीता, सुनंदा गायकवाड, गणेश फरताडे तसेच सर्व शिक्षक शिक्षकेतर कर्मचारी यांनी अभिनंदन केले.

# तेर येथील जिल्हा परिषद उर्दू प्रशालेचा दहावीचा निकाल ९५ टक्के

**आरंभ मराठी / तेर**

दहावी परीक्षेचा निकाल ऑनलाईन पद्धतीने एसएससी बोर्डाच्या वतीने जाहीर झाला असून, तेर येथील जिल्हा परिषद उर्दू प्रशालेचा दहावी परीक्षेचा निकाल ९५.४५ टक्के लागला आहे. प्रशालेतून एकूण २२ पैकी २१ विद्यार्थी उत्तीर्ण झाले आहेत. निकालाची टक्केवारी ९५.४५ टक्के इतकी आहे. उत्तीर्ण होणाऱ्या विद्यार्थ्यांपैकी प्रशालेतून अलीना सिद्दीक, पठाण जैनब फातिमा मोहम्मद आसिफ, काजी यशरा इरफान, काजी अदिबा हिफजूर्रहेमान, काजी रिमशा युसुफ यांनी उल्लेखनीय गुण घेऊन उत्तीर्ण झाली आहे. प्रशालेच्या एकूण निकालात ६ विद्यार्थी प्रथम श्रेणीमध्ये गुण प्राप्त करत उत्तीर्ण झाले आहेत. उर्वरित विद्यार्थी द्वितीय श्रेणीत उत्तीर्ण झाले आहेत. या यशाबद्दल शाळेचे मुख्याध्यापक तय्यबअली शहा सर्व शिक्षक वृंद तसेच शाळा व्यवस्थापन समिती आणि पालकांतून अभिनंदन व्यक्त करण्यात येत आहे.

# श्री तुळजाभवानी सैनिकी स्कूलचा दहावी बोर्ड परीक्षेचा निकाल १०० टक्के

**आरंभ मराठी / तुळजापूर**

तुळजापूर येथील श्री तुळजाभवानी सैनिकी माध्यमिक व उच्च माध्यमिक विद्यालयाचा इयत्ता दहावी बोर्ड परीक्षेचा निकाल प्रतिवर्षाप्रमाणे याही वर्षी १०० टक्के लागला आहे. शैक्षणिक वर्ष २०२४ -२५ मधील एसएससी परीक्षेत ५९ विद्यार्थी परीक्षेत प्रविष्ट झाले होते. यातील सर्वच विद्यार्थी उत्तीर्ण झाले आहेत. ५९ विद्यार्थ्यांपैकी सहा विद्यार्थ्यांना ९०% पेक्षा जास्त गुण मिळाले आहेत. या सर्व यशस्वी विद्यार्थी त्यांचे पालक तसेच मार्गदर्शक सर्व शिक्षकांचे जिल्हाधिकारी कीर्ती



किरण पुजार, आमदार राणा पाटील, विद्यालयाचे कमांडंट कर्नल मकरंद देशमुख, प्राचार्य घोडके, पर्यवेक्षक डॉ. पेटकर तसेच विद्यालयातील सर्व शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारी यांनी अभिनंदन केले. या यशामध्ये विद्यार्थ्यांची जिद्द विद्यार्थ्यांचा अभ्यास तसेच मार्गदर्शक सर्व शिक्षकांचे योग्य व वेळोवेळी केलेले मार्गदर्शन, मेहनत तसेच विद्यालयाचे कमांडंट व प्राचार्यांनी केलेले वर्षभरातील उत्कृष्ट नियोजन व पालकांचे सहकार्य यशासाठी कारणीभूत ठरले.

# तानाजी पुजारी यांचे दु:खद निधन

**आरंभ मराठी / तुळजापूर**



तुळजापूर शहरातील तानाजी कालिदास पुजारी यांचे वयाच्या ४२ व्या वर्षी अल्पशा आजाराने मंगळवारी (दि.१३) दु:खद निधन झाले. त्यांच्या पार्थिवावर तुळजापूर येथील बारालिंग रोड स्मशानभूमी येथे अंत्यसंस्कार करण्यात आले. ते काळभैरवाचे मुख्य पुजारी होते, त्यांच्या पश्चात दोन मुले, पत्नी व आई असा परिवार आहे .

# पहेलगाम येथील दहशतवादी हल्ल्यातून बचावल्याबद्दल ॲड. राजेश टेकाळे यांचा सत्कार

**आरंभ मराठी / मुरुड**

मुरुड येथून जवळ असलेल्या वाठवडा या गावचे सुपुत्र राजेश अण्णासाहेब टेकाळे आणि त्यांचे कुटुंबीय पर्यटनासाठी कश्मीरला गेले होते. पहेलगाम मध्ये ज्या ठिकाणी भीषण दहशतवादी हल्ला झाला. त्या भागाला तेही भेट देण्यासाठी गेले होते. यावेळी पाकिस्तानी अतिरेक्यांनी या पर्यटकावर बॉम्ब हल्ला केला होता. परंतु ते हल्ल्यातून बचावले होते. या दहशतवाद्यांच्या हल्ल्यात महाराष्ट्रातील सहा पर्यटकांसह २८ जणांचा दुर्दैवाने मृत्यू झाला होता. राजेश अण्णासाहेब टेकाळे हे मराठा आरक्षणाचे नेते मनोज जरांगे पाटील आणि महाराष्ट्राचे माजी मुख्यमंत्री व सध्याचे उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्यातील कायदेशीर सल्लागार म्हणून कार्य केले आहे. पहेलगाम येथील हल्ल्यातून बचावल्यानंतर पहिल्यांदाच आपल्या जन्मगावी म्हणजेच वाठवडा या गावी आले होते. यावेळी मराठा आरक्षणातील प्रमुख आंदोलक आनंद भांगिरे, हनुमंत पाटील व शिवलिंग चौधरी यांनी वाठवडा या गावी भेटून हल्ल्यातून बचवल्याबद्दल शुभेच्छा दिल्या. यावेळी त्यांचे वडील व ज्येष्ठ नागरिक संघटनेचे महाराष्ट्राचे अध्यक्ष अण्णासाहेब टेकाळे व चुलते शिवाजीराव टेकाळे उपस्थित होते.

# येरमाळ्यात सुरु होणार येडेश्वरी उपबाजार

## कळंब बाजार समिती पदाधिकारी-गावकऱ्यांच्या बैठकीत निर्णय,गावकऱ्यांची संमती

**आरंभ मराठी / येरमाळा**

मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, उपमुख्यमंत्री व पणन मंत्री जयकुमार रावल यांच्या संकल्पनेतून बाजार समितीने शेतकऱ्यांच्या दारी जाऊन अभियान राबवण्याच्या सूचना केल्या आहेत. यानुषंगाने कळंब कृषी उत्पन्न बाजार समितीचे सभापती शिवाजी कापसे, उपसभापती श्रीधर भवर तसेच सर्व संचालक मंडळ यांनी शेतकऱ्यांना बाजार समितीचे कामकाज कसे चालते,याबाबत शेतकरी मार्गदर्शनासाठी येरमाळा ग्रामपंचायत येथे शेतकऱ्यांसाठी शेतकरी संवाद व बाजार समितीची संचालक मंडळ सभा आयोजित करण्यात आली होती.या बैठकीत येरमाळा नगरीत कळंब कृषी उत्पन्न बाजार समितीच्या वतीने उपबाजार सुरू करण्यावर चर्चा करण्यात आली. या बाजारासाठी गावकऱ्यांनी एकमुखाने संमती दिली.या बाजारामुळे गावच्या विकासात भर पडेल,असा विश्वास मान्यवरांनी व्यक्त केला.सदर संवाद सभेत कार्यक्रमाची सुरुवात येडेश्वरी देवीच्या प्रतिमा पुजनाने झाली. सदर संवाद सभेमध्ये येरमाळा येथे उपबाजार पेठ सुरू करण्याबाबत चर्चा करण्यात आली. येरमाळा येथील कृषी विभागाच्या जागेत उपबाजारपेठ सुरू करण्यासाठी येरमाळा येथील संचालक विकास बारकुल व संचालक रामकिसन कोकाटे यांनी वारंवार बाजार समितीकडे पाठपुरावा करून याबाबतचा निर्णय घेण्यासाठी संचालक मंडळास प्रवृत्त केले होते. त्या उद्देशाने ही



बैठक महत्त्वाची ठरली. बैठकीस अध्यक्ष म्हणून येरमाळा विकास कार्यकारी सोसायटीचे चेअरमन रामकिसन बारकूल तर प्रमुख उपस्थिती गावच्या प्रथम नागरिक सरपंच सौ.प्रिया बारकूल यांची होती.तसेच बाजार समितीचे सर्व संचालक मंडळ,येरमाळा गावचे ग्रामपंचायत सर्व पदाधिकारी, विकास कार्यकारी सेवा सोसायटीचे माजी आजी सर्व संचालक मंडळ, गावातील प्रतिष्ठित व्यक्ती,माजी जिल्हा परिषद सदस्य,जवळपासच्या गावातील सोसायटीचे पदाधिकारी,सदस्य आदीसह २०० ते ३०० ग्रामस्थ उपस्थित होते. येरमाळा येथे उपबाजारपेठ सुरू होत असून,ही बाब येरमाळा गावासाठी सर्वात महत्त्वाची असेल. येरमाळ्याच्या दृष्टीने यातून विकासाचा प्रारंभ होणार आहे. त्याबद्दल मान्यवरांनी बाजार समितीचे आभार मानले. उपबाजारसाठी शेती विभागाची म्हणजे सीड फार्म जागा उत्तम आहे, असा सूर सर्व ग्रामस्थांतून निघाला. तर काहींनी त्याऐवजी गायरान अथवा माळावर जमीन घ्यावी किंवा काहींनी मंदिर रोडला बाजार चालू करण्याचे सुचविले. शेवटी सीड फार्म जागा योग्य आहे, सीड फार्मची जागा अंतिम करून लवकरच तसा ठरव पाठवू,असे ग्रामस्थांनी सुचविले. बाजार समितीला येडेश्वरी उपबाजार नाव दिले जाणार आहे.बाजार समितीला जागा द्या, आम्ही उपबाजार सुरु करू व प्रगतीसाठी लढू, असे उपसभापती बाबा भवर यांनी मनोगतात सुचविले. सदर सभेत सभेची व कामकाजाबाबतची माहिती सर्वांना बाजार समितीचे सचिव वाघ यांनी दिली.

# येणेगुर येथील कॅप्टन जोशी स्मारक विद्यालायाचा दहावीचा निकाल ९०.५२ टक्के

**आरंभ मराठी / येणेगूर**

उमरगा तालुक्यातील येणेगूर येथील कॅप्टन जोशी स्मारक विद्यालायाचा इयत्ता दहावीचा निकाल ९०.५२ टक्के इतका लागला आहे. प्रशालेतून एकूण ९५ विद्यार्थी परीक्षेत बसले होते. त्यापैकी ८६ विद्यार्थी उत्तीर्ण झाले. विशेष प्राविण्य ५२ प्रथम श्रेणी, २७ द्वितीय श्रेणी, ५ तृतीय श्रेणी २ विद्यार्थी उत्तीर्ण झाले आहेत. प्रशालेतून प्रथम साक्षी दत्तात्रय मिरगे ९३.८०%, द्वितीय कु.ज्योती ज्ञानेश्वर कवठे ९२.६०%, तर तृतीय कु.ज्योती शिवराज दूधभाते ९२.००% या विद्यार्थ्यांनी क्रमांक मिळाल्याबद्दल श्री परमहंस शिक्षण संस्थेचे सचिव बी ए बिराजदार, अध्यक्ष देवराज बिराजदार, प्रशालेचे मुख्याध्यापक महेश हरके, संचालक शंकर हुळम जगे, आनंदराज बिराजदार, प्रशालेतील परीक्षा विभाग प्रमुख महेश खंडाळकर, वर्ग शिक्षक शंकर हुळमजगे, महेश खंडाळकर,विषय शिक्षक व्यंकट बिराजदार, चंद्रकांत बिराजदार, कोमल कीर्तने गोपाळ गेडाम व सर्व शिक्षक शिक्षकेतर कर्मचारी यांनी सर्व उत्तीर्ण विद्यार्थ्यांचे कौतुक केले.

# वडगाव जिल्हा परिषद शाळेचा दहावी परीक्षेचा १०० टक्के निकाल

**आरंभ मराठी/धाराशिव**







दहावीचा परीक्षेत धाराशिव तालुक्यातील वडगाव (सि.) जिल्हा परिषद शाळेचा १०० टक्के निकाल लागला असून, शाळेतील विद्यार्थी सिद्धेश्वर महादेव क्षीरसागर हा ९२.४०% गुण घेऊन शाळेत प्रथम आला आहे. तर द्वितीय पार्थ शांतीलाल जाधव ८६% गुण, तृतीय माधुरी मधुकर मुळे ७९.८०% टक्के गुण घेऊन उत्तीर्ण झाली आहे. प्रशालेचे ७ विद्यार्थी विशेष प्राविण्यासह उत्तीर्ण झाले असून प्रथम श्रेणीमध्ये सात विद्यार्थी व द्वितीय श्रेणीमध्ये चार विद्यार्थी उत्तीर्ण झाले आहेत. सर्व यशस्वी विद्यार्थ्यांचे अभिनंदन वडगावचे ( सि) भूमिपुत्र शिक्षण उपसंचालक डॉ. गणपतराव मोरे, शाळा व्यवस्थापन समितीचे अध्यक्ष सोमनाथ पाटील व सर्व सदस्य,युवा नेते अंकुश मोरे, पंचायत समितीचे माजी सदस्य गजेंद्र जाधव, सरपंच बळीराम कांबळे, उपसरपंच जयराम मोरे, प्रशालेच्या मुख्याधापिका ज्योती राऊत, शिक्षिका सरोजा पाटील, रजनी रावळे, सुचिता शेलार, निर्मला गुरव व शिक्षकेतर कर्मचारी भूषण मदने आदींसह गुरुजी विचार मंच व गावकऱ्यांच्या वतीने यशस्वी विद्यार्थी व शिक्षकांचे अभिनंदन केले आहे.